संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 2 | Issue : 8 | Marathi Monthly | Thane, 1 February 2025 to 28 February 2025 | Pages 16 | Price : 10/-

# ‘ईव्हीएम’मधून मतांची चोरी-दरोडेखोरी करुन, निवणुका जिंकल्या जातात आणि तरीही, आम्ही गप्प बसून का आहोत?

## धर्मराज्य पक्षाध्यक्ष राजन राजे यांचा रोखठोक सवाल



अमृतमहोत्सवी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला (२५ जानेवारी-२०२५) ठाणे, शिवसेनेतर्फे शिवछत्रपतींच्या पुतळ्यापासून (मासुंदा तलाव) ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापर्यंत (ठाणे, रेल्वेस्थानक) ‘‘भारतमाता पूजन व संविधान सन्मान दिंडी’’ आयोजित करण्यात आली होती. मा. खासदार राजनजी विचारे यांच्या अधिपत्याखाली निघालेल्या या दिंडीत असंख्य शिवसैनिकांसह केदार दिघे, प्रदीप शिंदे, रेखा खोपकर, नंदिनी विचारे आदि ठाणे शिवसेना-पदाधिकारी सामील झाले होते. शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रभरात अशा दिंड्यांचं आयोजन करण्यात आलं होतं.

शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन बाजारपेठेतून दिंडी, बाबासाहेबांच्या पुतळ्यापर्यंत पोहोचली व तेथे बाबासाहेबांना विनम्र अभिवादन करत...धर्मराज्य पक्षाध्यक्ष राजन राजे यांच्या प्रबोधनपर भाषणापश्चात राष्ट्रगीत-गायनानंतर दिंडीची यशस्वी सांगता झाली!


‘‘भाजप-संघ सत्ताधाऱ्यांकडून प्रजासत्ताकाचा अमृतमहोत्सव, का साजरा केला जात नाहीय...??? सत्ताधारी भाजप-संघ, प्रजासत्ताकाचा ‘अमृतमहोत्सव’ (वर्ष १९५० ते वर्ष-२०२५) साजरा करण्याबाबत उदासीन का, याचा नीट विचार करा...याचं कारण, ते मूलतः, मुठभरांच्या हातात सत्ता केंद्रित ठेवण्याच्या ...पृष्ठ क्र. ३ वर

## ‘धर्मराज्य पक्षा’च्या ‘ईव्हीएम’विरोधी आंदोलनाला, उद्धव ठाकरेंचा पाठींबा!



दि. १९ जानेवारी-२०२५ (रविवार) रोजी धर्मराज्य पक्षाध्यक्ष राजन राजे यांनी आपले सुपूत्र ऋग्वेद राजे, ठाण्याचे माजी खासदार सर्वश्री राजनजी विचारे यांच्यासमवेत आपल्या सहकाऱ्यांसह (महेश ठाकूर, समीर चव्हाण, राजेश गडकर) शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांची मातोश्री बंगल्यावर भेट घेतली. ...पृष्ठ क्र. ८ वर

अं त रं ग



आधुनिक युद्धनीतीचा जनक राजा शिवछत्रपती!
पृष्ठ क्र. ६



*कुंभमेळा : सरकारने खर्च करावा का?*
*- हेरंब कुलकर्णी*
पृष्ठ क्र. ९



देवेंद्रजी, नक्षलवाद्यांविरोधात धडाडणाऱ्या तुमच्या बंदुका, भ्रष्टाचाराचा गंज चढल्याने इथे लाचार का होतात???
*- राजन राजे*
पृष्ठ क्र. १६

# प्रीपेड–स्मार्ट मीटर आणि ‘रक्तपिपासू’ व्यवस्थेविरोधात ‘धर्मराज्य पक्षा’चा हल्लाबोल

**‘‘प्रीपेड–स्मार्ट मीटर, हे जनतेला अधिकचा आर्थिक भुर्दंड देणारं व पाणीपुरवठ्यासारखी वीजपुरवठा ही जीवनावश्यक सेवा, बेफाम नफा कमावण्यासाठी खाजगीकरणाद्वारे अदानीसारख्या सत्ताधाऱ्यांचा बगलबच्चा असलेल्या बदनाम भांडवलदाराला मोकाट सोडण्याचं; तसेच, मोठ्याप्रमाणावर कामगार–कपात करत बेरोजगारी वाढवण्याचं समाजघातकी भांडवली–धोरणं होय!’’**

## ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांचा राज्य शासनावर जोरदार घणाघात...

राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गत सरकारच्या काळात उर्जामंत्री असताना, त्यांनी तत्कालीन पावसाळी अधिवेशनात, (दि. ३ जुलै–२०२४ रोजी) महाराष्ट्रीय जनतेला आश्वासन देताना, ‘‘सर्वसामान्य वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड वीज मीटर लावण्यात येणार नाही’’ अशी घोषणा केली होती. मात्र, विधानसभेत दिलेल्या आपल्याच आश्वासनाला हरताळ फासत, ठाणे जिल्ह्यासह महाराष्ट्रभरात स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्याची अदानी–कंपनीच्या माध्यमातून सुरुवात झालेली आहे. सुरुवातीला नादुरुस्त मीटर व नवीन वीज जोडणीकरीता, प्रीपेड–स्मार्ट मीटर बसविण्यास अदानी कंपनीने बेलाशक सुरुवात केलेली आहे. सर्वसामान्य जनतेची ही घोर फसवणूक, अदानीचं उखळ पांढरं करण्यासाठी सरकारने सुरु केलेली असून, या विरोधात ठाणे शहरातील विरोधी राजकीय पक्ष, समविचारी संस्था व डाव्या कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ‘ठाणे जिल्हा स्मार्ट प्रीपेड वीज मीटरविरोधी समिती’ची स्थापन करण्यात आलेली आहे.

याच अनुषंगाने, लाखो वीज ग्राहकांवर लादण्यात येणाऱ्या, स्मार्ट प्रीपेड मीटरच्या अरिष्टाबाबत, जनजागृती करण्याच्या उद्देशाने, दि. ७ जानेवारी–२०२५ रोजी, महावितरण कंपनीच्या वागळे इस्टेट, ठाणे येथील प्रशासकीय कार्यालयात एका द्वारसभेचं आयोजन करण्यात आले होते.

या सभेला ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी महावितरणच्या कामगारांना संबोधित करताना राजन राजे म्हणाले की, ‘‘प्रीपेड–स्मार्ट मीटरच्या माध्यमातून रक्तपिपासू–निर्दय–शोषक व्यवस्थेकरवी (Vampire State System) पहिली कुऱ्हाड ही, तरुण कंत्राटी–कामगारांवर पडणार आहे आणि त्यानंतर ती कुऱ्हाड, मनमानी चढ्या बिलांच्या रुपाने व रिचार्ज संपताच ‘बत्ती गूल’ होण्याच्या ‘दहशती’ने वीज–ग्राहकांवर पडणार आहे. गेली ३० ते ४० वर्षे महाराष्ट्रासहित संपूर्ण भारतात याच कंत्राटी–कामगार पद्धतीविरोधात मी धर्मयुद्ध पुकारलंय...एकीकडे सरकारी आर्थिक–धोरणं, कॉर्पोरेटीय व्यवस्थापकीय व उत्पादन–पद्धती, संदेशांची देवाणघेवाण–माहिती तंत्रज्ञान आणि संगणकीकरणासह, इतरही सगळीच क्षेत्र स्मार्ट बनलीयत... पण, आमचे पगार स्मार्ट कधी होणार? स्मार्ट मीटर लावण्याआधी आमच्या पगारालादेखील एक ‘स्मार्ट मीटर’ बसवा... देशाची आर्थिक प्रगतीसोबत महागाई, सेवाज्येष्ठता वाढताच ‘समृद्धी सर्वांची (Common-Prosperity)’ या तत्त्वानुसार ते आपसूकच भरघोस वाढले पाहिजेत... नाहीतर, आवक (पगार) वाढत नाहीत आणि वीज–बिलासारखी जावक वाढतच राहिली; तर संपूर्ण जनतेलाच ‘लाडक्या बहिणीं’सारखं दीड–दोन हजारी ‘गुलाम’ व्हावं लागेल!’’, असा जोरदार घणाघात आपल्या तडाखेबंद भाषणात केला.

‘‘मोदी–शहा आणि अदानी–अंबानी नव्हे; तर, आम्ही या देशाचे मालक आहोत...यांनी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला; पण, ते प्रजासत्ताकाचा अमृतमहोत्सव साजरा करायला उत्सुक नाहीत; कारण, प्रजा हीच या देशाची मालक, ही घटनादत्त संकल्पनाच यांना मान्य नाही...त्यांना मुठभरांची हुकूमशाही EVMची हेराफेरी करत निवडणुका जिंकून लादायचीय...तेव्हा, सावध होऊन काळाच्या हाका ऐका आणि सर्वसामान्य जनता व कामगार यांनी एकत्र येऊन या ‘रक्तपिपासू–निर्दय–शोषक (Vampire-State System)’ भांडवली–व्यवस्थेविरुद्ध लढलं पाहिजे, ही काळाची गरज आहे’’, अशा आवाहनासोबतच, ‘‘तरुणपण संघर्षात गुंतवलं नाही; तर, म्हातारपणी तुम्हाला लाचारीचा सामना करावा लागेल’’ असा गंभीर इशारा दिला. सरतेशेवटी, राजन राजे यांनी, ‘‘EVM सुरु राहिले तर, तुम्ही–आम्ही संपलो, या देशातली लोकशाही संपली, असं खुशाल समजा...कारण, सत्ताधाऱ्यांना तुमच्या जनमताची गरज EVMमुळे फारशी उरलेली नाहीये’’. म्हणूनच, २६ जानेवारी–२०२५ रोजी, प्रजासत्ताक दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून, रात्रौ ठीक ९.०० वाजता, फक्त ५ मिनिटांसाठी सर्वांनी आपल्या घरातील, कार्यालयांतील लाईट्स बंद ठेवून, ‘ईव्हीएम’चा निषेध नोंदविण्याचे आवाहन उपस्थितांना केले.






*‘‘नादुरुस्त विद्युत मीटर बदलण्याच्या बहाण्याने जनहितविरोधी स्मार्ट मीटर बसविण्याची’’ सुरुवात ठाण्यात झाली आहे. याविरोधात संघटित पद्धतीने लढा उभारण्यासाठी शनिवार, दिनांक ४ जानेवारी–२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता, सर्व श्रमिक संघ ऑफिस, भडकमकर हॉस्पिटलजवळ, महागिरी, ठाणे (पश्चिम) येथे कामगार संघटना, राजकीय पक्ष, युवक व विद्यार्थी संघटना यांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत जनहितासाठी संघटितपणे आवाज उठविण्याचे महत्त्व पटवून दिले. उपस्थितांनीही यावर उत्स्फूर्त प्रतिसाद देत, स्मार्ट मीटरसारख्या जनविरोधी योजनांविरोधात निर्णायक लढ्यासाठी सज्जतेचे संकेत दिले. यावेळी, कॉ. एम. ए. पाटील, कॉ. गिरीश भावे, कॉ. कृष्णा भोयर, कॉ. विश्वास उटगी, कॉ. उदय चौधरी, राष्ट्रवादीचे सुहास देसाई, शिवसेनेचे दादासाहेब रेपाळे आदी मान्यवर उपस्थित होते.*

# महाकाय तरतुदींचा पायाभूत प्रश्न: खर्चाचा बोजा आणि जनतेची जबाबदारी

**केंद्रीय अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी महाकाय तरतुदी असणार आहेत. काय होते या प्रकल्पांचे? या तरतुदींचे?**

एखाद्या प्रकल्पाचा अंदाजित खर्च १०० कोटी रुपयांवरून २०० कोटी झाला तर, जीडीपीमध्ये २०० कोटींची भर पडते, अनेकांचे खिसे भरतात, पण प्रकल्पाचा किफायतशीरपणा / व्हायबिलिटी कमी होतो, जनतेला अधिक टॅरिफ द्यावे लागतात!

**गेल्या काही वर्षांत देशाची जीडीपी वाढ बऱ्यापैकी ठेवण्यामध्ये केंद्र सरकारच्या पायाभूत सुविधा क्षेत्रातील भांडवली खर्चाने मोठा हातभार लावला होता. दरवर्षी लाखो कोटी रुपयांच्या तरतुदी, प्रत्येक अर्थसंकल्पात केल्या गेल्या होत्या.**

मागच्या वर्षी तर, पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी ११ लाख कोटी रुपयांची तरतूद होती, एक ऐतिहासिक उच्चांक. ११ लाख म्हणजे, एकूण अर्थसंकल्पाच्या २२ टक्के.

पण मंजूर केलेल्या, अर्थसंकल्पात तरतुदी केलेल्या या प्रकल्पांचे पुढे नक्की काय होते, ठरवेलला खर्च होतो वाढतो, खर्च वाढल्याचे परिणाम काय होतात? काय सगळ्या प्रकल्पांची अमलबजावणी होते, का त्यातील काही गुंडाळले जातात? या प्रश्नांची चिरफाड सार्वजनिक व्यासपीठांवर होत नाही.

CG / कॅग तर, केंद्र सरकारच्या अखत्यारीतील संस्था आहे. मार्च २०२३ पर्यंतच्या कॅगच्या लेखा परीक्षण अहवालानुसार भारतमाला प्रकल्पाचा अंदाजित खर्च १५८% वाढला होता.

CMIE च्या एका अहवालानुसार गेल्या १५ वर्षात अर्थसंकल्पनांमध्ये जाहीर केलेल्यांपैकी साडेचार लाख कोटींचे प्रकल्प गुंडाळून ठेवले गेले.

प्रकल्पाची अमलबजावणी लांबते त्यावेळी, नेहमीच प्रकल्पाचा भांडवली खर्च वाढतो. प्रकल्प सुरु करताना त्याची जी अपेक्षित व्हायबिलिटी असते, ती कम कुवत होते.

जनतेच्या दृष्टीने गंभीर बाब म्हणजे, वाढीव भांडवली खर्च भरून काढण्यासाठी वाढीव टॅरिफ / उपभोक्ता चार्जेस लावले जातात.

**उदा. एखाद्या हायवे रस्त्याचा प्रकल्प खर्च कोटी असेल, ज्याला व्हायेबल बनवायला वाहनाला १०० रुपये टोल बसवणार जाणार असेल आणि प्रत्यक्षात तो रस्ता १५०० कोटीमध्ये पूर्ण झाला तर टोलदेखील वाढवून १५० रुपये केला जातो (या आकड्यांवर घसरू नये; फक्त, मुद्दा मांडण्यासाठी उदाहरण दिले आहे**

**प्रश्न टोलचा नाही. वीजनिर्मिती, विमानतळ, बंदरे, रेल्वे, विविध पाइपलाइन्स यांचे प्रकल्पखर्च अंतिमतः नागरिक वस्तुमाल / सेवा खरेदी करतात त्यांच्या किमतीत प्रत्यक्ष / अप्रत्यक्षपणे प्रतिबिंबित होत असतात.**

**जे प्रकल्प पूर्ण होतात त्यांचे काय? त्यांच्या बांधकामाच्या गुणवत्तेबद्दल कोणीही जाबदायी नाही; २०२३-२४ वर्षात, काही दिवसांच्या अंतराने एकट्या बिहारमध्ये धडाधड १२ पूल कोसळले होते आणि जे कोसळत नाहीत, त्यांच्या दुरुस्तीवर पहिल्या वर्षांपासून मोठे खर्च होऊ लागतात.**

लोकांच्या आठवणीत काही राहत नाही, लोकांना निरनिराळे डॉट्स जोडून समग्र चित्र समजावून घ्यायची सवय नाही हे चांगलेच आहे!

नुकताच प्रजासत्ताक दिन साजरा केला आपण. म्हणजे प्रजेची सत्ता असणारा देश !

प्रजेला माहित नाही, आपण सत्ताधारी आहोत ते आणि सत्ताधारी राजकीय पक्ष / नेत्यांनी जनतेला जबादायी असले पाहिजे.

*...संजीव चांदोरकर*

## ...आणि तरीही, आम्ही गप्प बसून का आहोत? ...पृष्ठ क्र. १ वरुन

'वर्णवर्चस्ववादी-शोषक' मानसिकतेचे आहेत. ''प्रजासत्ताक' म्हणजे, प्रजा देशाची 'मालक' असण्याच्या 'लोकशाही-तत्त्वा'ला त्यांचा मुळातूनच विरोध आहे. ईडी-आयटी-सीबीआय यांच्या बेलगाम गैरवापरासह... नोटबंदी, इलेक्टोरल-बॉण्ड्स्, PMCare फंडासारख्या अनेक घोटाळ्यांतील काळ्या पैशाच्या सढळ वापरानंतर, आता EVM मधून मतांची चोरी-दरोडेखोरी करुन निवडणुका देशात जिंकल्या जातायत आणि तरीही, आम्ही गप्प बसून का आहोत?'' असा रोखठोक व मूलगामी सवाल, या प्रसंगी राजन राजे यांनी उपस्थितांना विचारला.

---

मी एका पगारातून किती वेळा कर भरावा आणि का??...
उत्तर आहे का??
मी तीस दिवस काम केले,
पगार घेतला - कर भरला.
मोबाईल विकत घेतला - कर भरला.
रिचार्ज - कर भरला.
डेटा घेतला - कर भरला.
वीज घेतली - कर भरला.
घर घेतले - कर भरला.
टीव्ही/फ्रीझ घेतले - कर भरला.
गाडी घेतली - कर भरला.
पेट्रोल घेतले - कर भरला.
सेवा पूर्ण झाली - कर भरला.
गाडी रस्त्यावर चालवली - कर भरला.
पुन्हा टोलवर - कर भरला.
निर्मित परवाना - कर भरला.
चालक परवाना घेतला - कर भरला.
तुम्ही चूक केली असेल तर - कर भरला.
रेस्टॉरंटमध्ये खाल्ले - कर भरला.
पार्किंगसाठी - कर भरला.




पाणी घेतले - कर भरला.
रेशन खरेदी केले - कर भरला.
कपडे विकत घेतले - कर भरला.
शूज विकत घेतले - कर भरला.
तुम्ही असंख्य वस्तु घेतल्या - कर भरला.
शौचालयात गेलो - कर भरला.
औषध विकत घेतली - कर भरला.
गॅस घेतला - कर भरला.

आणखी शेकडो गोष्टी घेतल्या आणि कर भरला. काही ठिकाणी फी भरली, काही ठिकाणी बिले भरली गेली, काही ठिकाणी व्याज भरले गेले, कुठे दंडाच्या नावाने, कुठे लाचेच्या नावाने पैसे द्यावे लागले, एवढ्या नाटकांनंतर, चुकून जर मी सेव्हिंगमध्ये बचत केली, तरही कर भरला.

आजीवन काम केल्यानंतर सामाजिक सुरक्षा नाही, पेन्शन नाही, वैद्यकीय सुविधा नाहीत, मुलांसाठी चांगल्या शाळा नाहीत, सार्वजनिक वाहतूक नाही, रस्ते खराब आहेत, पथदिवे खराब आहेत, हवा खराब आहे, पाणी खराब आहे, फळे आणि भाज्या विषारी आहेत. रुग्णालये महाग, दरवर्षी महागाईचा फटका, अनपेक्षित खर्च आणि संकटे, मग सगळीकडे रांगा.

**सगळा पैसा गेला कुठे?**

तर, भ्रष्टाचारात, निवडणुकीत, श्रीमंतांना कर्जमाफीत, मल्ल्यासारख्या फरार लोकांसाठी, श्रीमंतांच्या बनावट दिवाळखोरीत, स्विस बँकांमध्ये, नेत्यांच्या बंगल्यात आणि गाड्यांमध्ये, आणि सामान्य लोकांना झंडू बनवायला!!!

आता कोण सांगू चोर कोण? अखेर आपले देशवासी असेच किती दिवस ओढाताणीत जीवन जगत राहणार?

कृपया प्रत्येक नागरिकाला हे सांगा. इतका महसूल तर, इंग्रजांनीही कधीच घेतला नाही!!!

*- सोशल मीडीयातून साभार*

# वायुप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या, घोडबंदर महामार्गावरील प्रस्तावित आरएमसी प्लांटवर त्वरित बंदी घालण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) : गेल्या काही कालावधीपासून ठाणे शहरातील वातावरण प्रदूषित झालेले असून, शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारा मेट्रो प्रकल्प आणि ठिकठिकाणी सुरु असलेली निवासी प्रकल्पांची बांधकामे, यामुळे ठाण्याची हवा दुषित होऊन, हवेचा स्तर पूर्णपणे घसरलेला दिसून येत आहे. परिणामी, खोकला आणि दम्याच्या आजारात मोठ्याप्रमाणात वाढ झाल्याचे आढळून आले आहे. मुंबईचे धाकटे भावंडं, अशी ठाणे शहराची ओळख गेल्या काही वर्षांत निर्माण झालेली असतानाच, ठाण्याचे नागरीकीकरणही तेवढ्याच प्रचंड प्रमाणात झालेले आहे. ठाणे शहराची वाढती लोकसंख्या ही, वाढत्या वाहतूक कोंडीलादेखील कारणीभूत ठरत आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे, आधीच वायुप्रदूषण आणि ध्वनीप्रदूषणामुळे ठाणेकर नागरिक त्रासलेले असतानाच, सध्या ठाणे शहरात मोठ्याप्रमाणात सुरु असलेल्या बांधकाम प्रकल्पांमुळे, एकेकाळी तलावांचे शहर अशी ओळख असणाऱ्या ठाण्याची ओळख आता, 'प्रदूषित शहर' अशी निर्माण झालेली आहे.** सद्यस्थितीत ठाणे शहरातील हवेचा दर्जा पूर्णपणे घसरलेला असल्याचे, प्रसिद्धीमाध्यमांतील बातम्यांच्या माध्यमातून स्पष्ट झालेले आहे. गेल्या काही वर्षांत, घोडबंदर महामार्गालगत अनेक निवासी संकुले उभी राहिली आहेत आणि आजही मोठमोठ्या निवासी संकुलांची/ प्रकल्पांची बांधकामे सुरु आहेत. परिणामी, घोडबंदरचे आता धूळबंदर असे नामांतर झाल्यास, आश्चर्य वाटायला नको. याच पार्श्वभूमीवर, वायुप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या, घोडबंदर महामार्गावरील प्रस्तावित आरएमसी प्लांटवर त्वरित बंदी घालण्याची मागणी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने करण्यात आली आहे. दरम्यान, हिरानंदानी–वाघबीळ याठिकाणी, गेल्या काही महिन्यांपासून एका मोठ्या गृह प्रकल्पाचे खोदकाम सुरु असून, अनेक जेसीबी मशिन्सच्या माध्यमातून हे काम दिवस–रात्र सुरु असते. या खोदकामामुळे मोठ्याप्रमाणात धुरळा उडून, परिसरातील नागरिकांना याचा त्रास होत आहे. असे असतानाही, ठाणे शहरातील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी, महापालिका प्रशासनाकडून याबाबत कोणतीही दखल घेतली जात नाही. याच अनुषंगाने, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि पक्षाचे सचिव नरेंद्र पंडित यांनी, राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच, पर्यावरणमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव अविनाश ढाकणे आणि ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांना पत्र लिहून, आरएमसी प्लांटवर त्वरित बंदी घालण्याची मागणी मागणी केली आहे. मुंबईच्या हवेचा स्तर वाईट झालेला असल्याकारणाने, तसेच बोरीवली पूर्व आणि भायखळा या परिसरांतील हवा 'अतिवाईट' श्रेणीत गेल्याने, तेथील सर्व बांधकामे बंद करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतलेला आहे. ज्या विभागातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक २००च्या वर जाईल, त्या विभागातील सर्वच बांधकामे बंद करण्याचे आदेश मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले असल्याचे प्रसिद्धीमाध्यमांद्वारे स्पष्ट झालेले आहे. यासंदर्भात, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य–सचिव अविनाश ढाकणे आणि ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांना, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने दि. ०१ जानेवारी–२०२५ रोजी, पत्र पाठवून (संदर्भ क्र. धराप/सस–मराप्रनिमंमुं/ मनपाआ–ठामपा/२०२४/७७) वायुप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या, ठाणे शहरातील बांधकाम प्रकल्पांवर बंदी आणण्याची मागणी करण्यात आली होती; मात्र, प्रशासनाकडून त्याची कोणतीही दखल घेण्यात आली नाही. तसेच, याआगोदर घोडबंदर महामार्गावरील वृक्षतोडीसंदर्भातही हिरानंदानी या व्यवसायिकाच्या विरोधात लिखित तक्रार करण्यात येऊनही, महापालिका प्रशासनाने आणि स्थानिक पोलीस स्टेशन यांनी त्याकडे 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष केले होते. याच पार्श्वभूमीवर, महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी पाठविलेल्या पत्रात प्रशासनाला सूचित केले आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर, ठाणे शहरातील वायुप्रदूषणास



कारणीभूत ठरलेल्या किंवा ठरु पाहणाऱ्या बांधकाम प्रकल्पांवर कठोर निर्बंध घालण्याबरोबरच, ठाणे शहरातील घोडबंदर महामार्गाच्या हिरानंदानी–वाघबीळ परिसरात, एका आरएमसी प्लांटचे काम प्रस्तावित असून, त्यावर त्वरित बंदी घालण्यात यावी. आरएमसी प्लांटच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य ती प्रणाली उभारणे, उत्सर्जन कमी होण्यासाठी पाण्याचा पुनर्वापर करणे, प्लांटमधून ये–जा करणाऱ्या वाहनांची चाके धुण्यासाठी स्वयंचलित यंत्रणा उभारणे, कच्च्या मालाच्या हस्तांतरणाचे क्षेत्र बंदिस्त ठेवणे, अशा बाबींचा समावेश करावा. **दरम्यान, हा प्लांट उभारला गेल्यास, इथल्या निवासीक्षेत्राला, सिमेंट निर्मितीद्वारे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचा मोठ्याप्रमाणात त्रास होऊ शकतो. त्याचबरोबर या प्रदूषणामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवू शकतो. तसेच, हिरानंदानी–वाघबीळ परिसरासह, ठाणे शहरातील इतर ठिकाणी असलेले आरएमसी प्लांट, त्वरित बंद करण्यात येऊन, नवीन आरएमसी प्लांट उभारण्यासाठी परवानगी देण्यात येऊ नये, अशी आग्रही मागणी करुन, याप्रकरणी राज्य शासन आणि ठाणे महापालिका प्रशासनाने ठोस पाऊले न उचलल्यास, 'धर्मराज्य पक्ष' तीव्र जनआंदोलन उभारेल, असा इशारा महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी आपल्या पत्रातून शेवटी दिला** आहे.

---

*नामदेवा...*
*लेका तू आम्हाला क्रांतीचं येड लावलंस*
*आणि झालास नामानिराळा*

*तुझ्या कविता वाचता वाचताच*
*आम्हीही केला आमच्या जीवाचा रायरंद*
*आणि गायलं माणसाचं गाणं उत्तुंग*

*तुझ्या गतिमान पावलांच्या ठशावर*
*आमची इवलीशी पाऊलं जुळवत*
*जुळवतच*
*आम्हीही लिहिली कविता...*
*अंतरीचं शब्दातीत भय मुळासकट*
*जाळूनच,*



*आम्हीही खेळलो हत्तीसंग दांडू मनसोक्त...*
*तुझ्या भाषिक बंडाचा बंडकरी झाल्यावरच,*
*आम्ही वाचले बारकाईने आमच्या*
*आयुष्यांचे पेटलेले वणवे...*
*सुर्यावरील हायड्रोजनच्या स्फोटांप्रमाणे,*
*घट्ट लागले युगांयुगांच्या घुसमटीचे स्फोट*
*आमच्या अंतरी...*

*सृजनांच्या पलित्यांनी उजळले*
*आमचे पुरातन निबर चेहरे*
*आणि आम्ही भेदली आमच्या*
*जिभेवरील हजारो वर्षांची जाळरेषा...*

*आमचा अवताल–भवताल होत राहिला*
*रक्तबंबाळ,*
*वाटेत न संपणारी अरण्ये येतच राहिली*
*नित्यनेमाने...*
*निराशेचे ढग दाटून येत असताना,*
*आम्ही तुझा गोलपीठा गात राहिलो,*
*क्रांतीच्या विद्यापीठात येत राहिलो...*

*काही महाग्यान्यांनी आम्हांला सांगितलं...*

*अरे रे रे..................*
*''नाम्यानं छावण्या बदलल्या''*
*आम्ही त्यांच्या डोळ्यांतील दंभाचं*
*व्याकरण ओळखलं आणि सांगितलं*
*''नाम्याच्या कवितेने तर छावण्या*
*हालवल्या''*

*नामदेवा...*
*लेका तू आम्हांला क्रांतीचं येड लावलंस*
*आणि झालास नामानिराळा...*
*तरीही, आम्ही तुझेच छावे एका शापित*
*पर्वत रांगेतील !!!*
*सत्यशोधक*

*–सचिन माळी*

# अपयशी... पण, प्रसिद्धीलोलूप!

उज्वल निकम हे ''नांगरे पाटलांनंतरचे चमकू'' म्हणून ओळखले जाण्यासारखे एक व्यक्तिमत्त्व बनले आहे. त्यांना त्यांच्या वकिलीच्या कारकिर्दीपेक्षा जास्त प्रसारमाध्यमांमध्ये दिसण्यासाठी आणि मोठ्या प्रकरणांशी त्यांचे नाव जोडण्यासाठी प्रसिद्धी मिळाली आहे. परंतु, त्यांच्या यशाची टक्केवारी आणि प्रकरणांमधील काम गिरी यावर फारसा अभ्यास होत नाही.



**महत्त्वाची अपयशं:**

**१. गुलशन कुमार मर्डर केस (१९९७):**

या प्रकरणात उज्वल निकम सरकारी वकील होते; परंतु, अबू सालेम आणि त्याच्या टोळीला दोषी ठरवण्यात ते अयशस्वी झाले.

**२. प्रीती जैन वि. मधुर भंडारकर केस (२००४):**

अभिनेत्री प्रीती जैनने दिग्दर्शक मधुर भंडारकर यांच्यावर बलात्काराचा आरोप केला होता. या प्रकरणात पुरावे टिकाव धरू शकले नाहीत, आणि भंडारकर निर्दोष सुटले.

**३. दाभोलकर आणि पानसरे हत्याकांड (२०१३–२०१५):**

या महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये न्याय मिळवण्याची मोठी अपेक्षा होती. मात्र, तपास आणि पुरावे प्रभावीपणे सादर करण्यात अपयश आल्याने हे खटले निकामी ठरले.

**४. सांगली सिड हल्ला केस (२००९):**

या प्रकरणात आरोपींना अपेक्षित शिक्षा झाली नाही, ज्यामुळे निकम यांच्या कौशल्यावर प्रश्नचिन्ह उभं राहिलं.

**५. २०१५ मुंबई डान्स बार प्रकरण:**

महाराष्ट्र सरकारच्या बाजूने काम करताना, त्यांनी डान्स बारसंदर्भातील खटला लढवला; परंतु, न्यायालयाने डान्स बारवरील बंदी उठवली, ज्यामुळे सरकारचे नुकसान झाले.

**उज्वल निकम यांना २६/११ दहशतवादी हल्ला (कसाब प्रकरण) आणि १९९३ बॉम्बस्फोट प्रकरण यांसारख्या खटल्यांमुळे मोठी प्रसिद्धी मिळाली. मात्र, २६/११ प्रकरणात जिल्हा पातळीवरील एखादा वकील नेमला असता, तरीही कसाबला फाशी झाली असती, असा तज्ञांचा दावा आहे.**

एकूण यशाचा टक्का: निकम यांच्या सर्व प्रकरणांपैकी ३०–४०% खटल्यांतच यश मिळाले आहे. त्यांची यशाची आकडेवारी ठळक नसली तरी, प्रसारमाध्यमांशी असलेल्या त्यांच्या सुसंवादामुळे त्यांना लोकांमध्ये मात्र, चमकदार प्रतिमा उभी करता आली आहे.

उज्वल निकम हे त्यांच्या यशापेक्षा प्रसिद्धीसाठी ओळखले जातात. त्यांच्या वकिली कौशल्याची यशस्वी आणि अपयशी प्रकरणांच्या आधारे चर्चा केली तर, प्रतिम ेचा फोलपणा सहज दिसतो.

***...समाजमाध्यमातून साभार***

# सौदीतलं स्त्रीत्त्व!

२००८/२००९च्या सुमारास, आम्ही (हनीवेल) सौदीत काम मिळवलं. मी त्या प्रोजेक्टच्या सेल्सच्या लीडरशिप टीममध्ये होतो. प्रचंड मोठं काम होतं आणि जोखमीचंही होतं. 'किंग अब्दुल्ला युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी' हे त्या प्रोजेक्टचं नाव... किंग अब्दुल्ला युनिव्हर्सिटी, जेद्दाह इथे हा प्रोजेक्ट होता. ही युनिव्हर्सिटी नव्याने स्थापन झाली होती. ३० ते ४० मुलं, अगदी नव्याने घेऊन आम्ही हा प्रोजेक्ट ४ वर्षे केला.

**२००९च्या सुमारास स्थापन झालेली ही युनिव्हर्सिटी, सौदीतली पहिली को–एड युनिव्हर्सिटी होती. (जिथे मुलं आणि मुली एकत्रित शिकतील) सौदीच्या दृष्टीने ही, एकप्रकारे सांस्कृतिक क्रांती होती. त्यात शिकवणारे प्राध्यापक उच्चदर्जाचे हवेत, लॅबोरेटरीज अद्ययावत असाव्यात म्हणून, सौदीने पाण्यासारखा पैसा युरोप आणि अमेरिकेत ओतला. २०१६ साली 'नेचर इंडेक्स'मध्ये ह्या युनिव्हर्सिटीचं रँकिंग जगात सोळावं होतं. (वय वर्ष ५०ने लहान असणाऱ्या युनिव्हर्सिटीत) विज्ञान आणि तंत्रज्ञानात सर्वात वेगाने प्रगती करणारी युनिव्हर्सिटी म्हणून... २०१९मध्ये हेच रँकिंग ८ वर गेलं!**

सर एडवर्ड बायरन, ज्यांना ''ga' ही पदवी, त्यांच्या शिक्षण आणि संशोधनातल्या कार्याबद्दल बहाल केली गेली. २०२० साली हे ह्या युनिव्हर्सिटीचे आजचे लीडर आहेत.



तुम्ही हे लक्षात घेतले पाहिजे की, जेद्दाह हे तरीही एक सागरी बंदर आहे. अशी सागरतीरी वसलेली शहरे सांस्कृतिकरित्या बरीच लिबरल होतात. त्याचे कारण, बाहेरच्या ''जगाशी'' सारख्या चाललेल्या देवाण–घेवाणींमुळे. रियाध तर सौदी वाळवंटाच्या मध्यभागी आहे. कर्मठतेचं एपिसेंटर. तिथेही माझ्या हनीवेलमधल्या पुढच्या पिढ्यांनी काम केलं. तिथेच प्रिन्सेस नूरा, ही मुलींची युनिव्हर्सिटी आहे. १९७० साली सौदीत मुलींची अनेक कॉलेजेस नव्याने तयार केली गेली.

२००९ साली, सौदी राज्यव्यवस्थेनं रियाधमधल्या सहा कॉलेजेसना मिळून, स्वतंत्र युनिव्हर्सिटीच्या दर्जा दिला. रियाधमधली सहा कॉलेजेस ह्या युनिव्हर्सिटीमध्ये येतात. त्याव्यतिरिक्त मुलींसाठी सौदीत, १०२ कॉलेजेस आहेत. सुमारे ७२ शहरांमध्ये... सायन्स, अर्थशास्त्र, मेडिकल हे सगळं येथे शिकवतात...

किंग अब्दुल्ला युनिव्हर्सिटी काय, प्रिन्सेस नूरा युनिव्हर्सिटी काय, दोन्हींना प्रचंड राजाश्रय आहे, ही सर्वात महत्त्वाची बाब. २०१८ साली, प्रिन्स सलमानने येथेच मुलींसाठी सौदीच्या इतिहासातील पहिलं ड्राइव्हिंग स्कूल उघडलं, तेव्हा काही कामासाठी मी सौदीत होतो. ह्या बातमीने मुलींमध्ये प्रचंड खळबळ उडवली होती आणि उत्साहही निर्माण केला होता... काल मुस्लिम मुलींच्या शिक्षणाबद्दल पोस्ट टाकली होती. आज हेही विस्तृतपणे सांगावसं वाटलं... कारण, हे माझे प्रत्यक्ष आयुष्यातले अनुभव आहेत.

**आज परत सांगावेसे वाटले; कारण, फातिमा शेख, सावित्रीबाई फुले हे गेले दोन दिवस सोशल मीडियावर धुराळा उडवणारे विषय. काही गोष्टी आपल्या सातत्याने लक्षात राहत नाहीत. जग सारखं/सातत्याने बदलत असतं, कालचा रेफरन्स आज कालबाह्य होऊ शकतो. कालचा काश्मीर, कालचा सौदी, कालचा महाराष्ट्र, कालची मुंबई आज अस्तित्वात नाही... आजचा उद्या नसणार. ही आता रिअल–टाईम घडामोड आहे...**

आपलं जे काही व्हायचं असेल, त्यासाठी बेंचमार्क्स लागणार आहेत. असे बरेच बेंचमार्क्स हे, पुणे–डेक्कन परिसर, कोथरुड किंवा मुंबई... पुढे महाराष्ट्र, अखंड भारत, राऊत, पवार, अजितदादा, फडणवीस, सकाळ, लोकमत, टाइम्स ऑफ इंडिया हे पेपर्स, रिल्स ह्या सर्वांपलिकडेदेखील आहेत, तेही बघावे लागतील !!!

***....जगदीश नाईक***

# आधुनिक युद्धनीतीचा जनक : राजा शिवछत्रपती!



**शिवाजीराजांचा काळ हा, आपल्या इतिहासातील सुवर्णकाळ का आहे, याचा विचार करता आपल्या असे लक्षात येते की, ज्याप्रमाणे पूर्वीच्या आक्रमकांनी त्या त्या काळातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन हल्ले केल्यामुळे आपण त्यांचे गुलाम झालो, त्या इतिहासाचा अभ्यास करुन, शिवाजीराजांनी त्यांच्या काळात असलेले आधुनिक तंत्रज्ञान हस्तगत करुन, ते आपल्या युद्धकौशल्यात वापरले. समुद्रपर्यटन निषिद्ध मानले जाणाऱ्या अंधश्रद्धायुक्त काळातही, या धार्मिक मान्यतांना जुगारुन आरमारी वचक त्यांनी बसवला. शिवाजीराजांनी त्यांच्या काळात असलेल्या सगळ्या अंधश्रद्धांना मूठमाती दिल्यामुळेच, आक्रमकांपेक्षा ते वरचढ ठरले आणि सतत विजयामागून विजय मिळवत राहिले.**

उठताबसता शिवाजीराजांचे नाव घेणाऱ्या, ''राजे आमचे आदर्श आहेत'' म्हणून कंठशोष करणाऱ्या आणि लोकांना भावनेच्या प्रवाहात बुडवून त्यांच्या अस्मितांना टोकदार करुन उल्लू बनवत, स्वतःचा मतलब साधण्यासाठी, शिवाजीराजांचे दैवतीकरण करणाऱ्या राजकारण्यांना हे कळत नसेल काय?

या आशयाचा 'तंत्राधिष्टीत शिवनीती' हा पंकज कणसे लिखित, लोकसत्तेतील लेखातील हा महत्त्वाचा अंश...

**छत्रपती शिवाजी महाराज हा, इतिहासात उमटलेला सुवर्णठसा ठरतो. या सोनेरी इतिहासाचे विश्लेषण करताना असे लक्षात येईल की, तंत्रज्ञानात्मक दृष्टिकोन हा महाराजांच्या राजकारणाचा कायमच पाया राहिला. भौतिक स्वरुपात प्रकट होणारे किल्ले उभारणी, आरमार निर्मितीसारखे तंत्रज्ञानात्मक आविष्कार, हे केवळ हिमनगाच्या दृश्य स्वरुपासारखे आहेत; तर, त्यामागील तांत्रिक विचार आणि तात्त्विक चौकट, डोळ्याला न दिसणाऱ्या हिमनगासारखी गूढ आणि अदृश्य आहे, जिने हा दृश्य डोलारा सांभाळला आहे. अस्तित्वात असणारी धार्मिक-सामाजिक परिस्थिती, भूगोलाचे प्रारुप, प्रतिस्पर्ध्यांच्या ताकदीचा अंदाज आणि उपलब्ध मनुष्यबळाचा कुशलतेने वापर, या सगळ्यांचा मेळ घालून उपलब्ध स्रोतांचा कल्पक वापर करण्यासाठी भावनांशी सलगी सोडून, तांत्रिक दृष्टिकोनाचा अंगीकार महाराजांनी आपल्या कार्यसिद्धीसाठी केला.**

छत्रपती शिवरायांच्या महाराजांच्या युद्धतंत्र, किल्लेबांधणी आणि राज्यविस्तार या सर्वांचे मूळ आपणास भूगोलाच्या वैज्ञानिक विश्लेषणामध्ये दिसून येईल. जेव्हा समाज धार्मिक अंधश्रद्धांमुळे समुद्रगमन निषिद्ध मानत होता, तेव्हा मुघल आणि इतर साम्राज्यांनी समकालीन समुद्रमार्गांना दुय्यम मानले होते. मात्र, महाराजांनी बारकाईने विचार करुन नाविक ताकदीचे महत्त्व ओळखले. भारतीय सत्ताधारी १०० वर्षांनंतरही आपापसांत भांडत असताना, युरोपियन लोकांचे भारतात येण्याचे उद्दिष्ट केवळ व्यापार नाही, हे त्यांनी ओळखले. त्यांनी स्वतःचे आरमार केवळ उभेच केले नाही; तर, समुद्रीमार्गांवर वचक बसविला. हे करताना त्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागला. देशी कारागिरांकडे जहाजबांधणीचे कौशल्य उपलब्ध नव्हते; तेव्हा, त्यांनी स्वतःच्या कमतरता ओळखून युरोपिअन लोकांना चाकरीस ठेवले. पोर्तुगीज आणि ब्रिटिश एक होऊन आव्हान देऊ लागले तेव्हा, महाराजांनी फ्रेंचांकडून जहाजावरील प्रगत उपकरणे आणि शस्त्रास्त्रे विकत घेऊन आपली तांत्रिक बाजू वरचढ ठेवली.

**शिवाजी महाराजांची तांत्रिक दूरदृष्टी त्यांच्या काळातील भू-राजनीतिक परिस्थितीवर मोठा प्रभाव टाकणारी होती, ज्यात तंत्रज्ञानाचा धोरणात्मक उपयोग दिसून येतो. दुर्गांची उभारणी करताना, त्यांनी प्रत्येक किल्ल्याची रचना वैशिष्ट्यपूर्ण केली. त्यामध्ये सिंधुदुर्गाचा अनियमित आकार, रायगडाची भव्यता, राजगडाची अभेद्याता, प्रतापगडाची दुर्गमता या सर्वांचा समावेश होईल. प्रत्येक किल्ल्यावर पाण्याची मुबलक सोय करुन, कमी स्रोतांमध्ये किल्ल्यांची संघर्षशक्ती वाढवली. आलिशान सजावट, कलादालने वगैरे टाळून प्रतिस्पर्ध्यांच्या तुलनेत असलेल्या कमतरतेची कायम जाणीव ठेवली. बिनीचे मार्ग, सागरी टापू, टेहळणीच्या जागा या सर्व महत्त्वाच्या ठिकाणी किल्ल्यांची उभारणी अथवा डागडुजी केली. सिंधुदुर्गच्या उभारणीमध्ये समुद्रामध्ये पाण्याखाली अंदाजे १२२ मीटर लांब, तीन मीटर उंच आणि सात मीटर रुंद भिंत बांधल्याचे दाखले आहेत. त्यामुळे किल्ल्याकडे येणारी शत्रूची गलबते फुटून निकामी होत असत.**

गनिमी कावा ही, शिवाजी महाराजांनी विकसित केलेली एक युद्धनीती होती, ज्यात स्थानिक भूभागाचे ज्ञान आणि मोजक्या घोडदळाच्या जलद हालचालींचा वापर, यातून शत्रूच्या रसद पुरवठ्याचे मार्ग कापून टाकले जायचे. गरजेनुसार कल्पकता अवलंबणे हेदेखील महाराजांचे एक वैशिष्ट्य! वाघनखांचा वापर, ही त्याच कुशाग्र बुद्धिमत्तेची चुणूक. पुढे जाऊन त्यांनी ठिकठिकाणी दारूगोळ्याचे कारखाने काढण्यासाठी पुढाकार घेऊन तोफशास्त्र विकसित करण्याचा प्रयत्न केला.

शिवराय राज्यकर्ते म्हणून एकमेवाद्वितीय असले तरी, त्यांचे वारसदार म्हणून आपण कुठे आहोत? भावना आणि अस्मितांच्या कोंडाळ्यात अडकून महाराजांचे दैवीकरण करुन, आपण चिकित्सेची दारे बंद करायला सुरुवात केली. वसंत कानेटकरांच्या शब्दात, महाराजांनी इथल्या सामान्य गवताच्या पात्याचे भाल्यात रूपांतर केले. आपण आपल्याच हातांनी त्या पात्याचे निर्माल्य करुन घेण्याचे पातक करीत आहोत. ते भाले होण्याची प्रेरणा महाराजांनी युद्धशास्त्रपारंगता, वैज्ञानिक-तांत्रिक दृष्टिकोन, चिकित्सक वृत्ती आणि करारी व्यवहारवाद यांच्या मिलाफातून प्रसवलेली संजीवनी होती. ती पुन्हा प्राप्त करुन घेण्यासाठी, पुन्हा त्याच विज्ञान-तंत्रज्ञान केंद्रित वाटा धुंडाळण्याची वेळ आलेली आहे !!!

## कॉ. प्रकाश रेड्डी यांच्याकडून...

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी, मा. शरद पवार यांनी, नरेंद्र मोदी यांना आमंत्रण दिलं, हे वाचून खेद वाटला व मन संतप्त झालं. नरेंद्र मोदी यांनी, पंतप्रधान या नात्याने महाराष्ट्रावर व मराठी जनतेवर सतत अन्यायच केला आहे. विशेषतः मुंबईचे उद्योगधंदे गुजरातला पळवण्याचे त्यांचे कारस्थान हे, मराठी माणसांवर अन्याय करणारे आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी, मोदींचे व केंद्र सरकारचे काहीही योगदान नाही. मराठी जनतेच्या रेट्यामुळे, केंद्र सरकारला मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देणे भाग पडले आहे. त्यासाठी प्रचंड विलंबही लागला आहे. भाषावार प्रांतरचनेच्या निर्मितीसाठी, मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य निर्माण व्हावे यासाठी, १०६ हुतात्म्यांनी बलिदान दिले आहे. महाराष्ट्रावर अन्याय करणाऱ्या मोदींना, 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'चे उद्घाटन करण्याचे आमंत्रण देऊन, शरद पवारांनी हुतात्म्यांचा अपमान केला आहे.

**मा. शरद पवारांचा निषेध... निषेध... निषेध !!!**

# गांधी हत्या, आर्थिक विषमता व अर्थसंकल्प !

## प्रा. डॉ. रावसाहेब कसबे लिखित गांधी (दुसरी आवृत्ती) या ग्रंथातील पृष्ठ क्र. ३३७वर डोळ्यांत अंजन घालणारी 'आर्थिक' माहिती दिली आहे...

२ मार्च-१९३० साली, व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांना लिहिलेल्या पत्रात गांधी सांगतात की, १९३० साली व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांचा पगार रुपये २१,०००/- अधिक, इतर सुविधा इतका होता. त्याच वेळेस सामान्य भारतीय नागरीकाची रोजची मिळकत सरासरी २ आणे इतकी होती. म्हणजे, व्हाईसरॉयची दैनंदिन मिळकत रुपये ७०० पेक्षा अधिक होती व ती सामान्य भारतीयाच्या दैनंदिन मिळकतीपेक्षा सात हजार पटीने जास्त होती!

आता आपण आजच्या जगात येऊ या... २०२५च्या जानेवारी महिन्यातील हिंदुत्ववादी नथुराम गोडसेकृत, सनातनी हिंदू महात्मा गांधी हत्या दिनी, (३० जानेवारी) इंटरनेटवर शोध घेतला असता, दि. २९ सप्टेंबर-२०२४ रोजीचे 'डेली न्यूज नालिसिस' म्हणजे 'डीएनए' या इंग्रजी दैनिकाचे संकेतस्थळ (वेबसाईट) सांगते की, भारतात मुकेश अंबानींची एका दिवसाची मिळकत आहे, रुपये १६३ कोटी. याउलट सामान्य भारतीयांची मिळकत किती आहे? दि. ३० जानेवारी-२०२५ रोजी, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी संकेतस्थळ सांगते की, २०२४ साली भारताचे दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्न होते, २९४०/.... यावर्षी रुपया-डॉलर यातील सरासरी विनिमय दर होता, एका डॉलरला रुपये ८३/- या दराने भारताच्या दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्नाला गुणल्यास आपणांस कळते की, २०२४ साली आपल्या देशाचे दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्न, रुपये २,४४,०२०/- होते. या उत्पन्नाला १२ने भागल्यास, आपणांस २०२४ साली भारताचे दरडोई-दरमहा उत्पन्न, रुपये २०,३१८/- एवढे असल्याचे कळते. या रकमेला ३०ने भागल्यास, आपणास भारताचे दरडोई-दरदिवशी असणारे सरासरी उत्पन्न भेटते. ते आहे, रुपये ६७८/- (अक्षरी रुपये सहाशे अठ्ठ्याहत्तर फक्त)

अर्थ उघड आहे, मुकेश अंबानी दररोज रुपये १६३ कोटी कमावतात व सामान्य भारतीय दररोज रुपये ६७८ कमावतात!

आता जरा डोकं खाजवा. मुकेश अंबानींचे दैनिक उत्पन्न सामान्य भारतीयाच्या दैनिक उत्पन्नाच्या किती पट आहे? गांधीजींचा हिशोब लावला तर, रुपये ६७८च्या सात हजार पट होतात, रुपये ४७,४६,०००/- फक्त. म्हणजे, सामान्य भारतीयांच्या सरासरी उत्पन्नाच्या सात हजार पट असलेले, सुमारे ४८ लाख रुपये हे, मुकेश अंबानींच्या एका दिवसाच्या १६३ कोटी रुपये, या रकमेच्या खिजगणतीतही नाहीत. ते नेमके किती पट आहेत, ते जरा शोधून काढा!

माझा प्रश्न थोडा वेगळा आहे... ब्रिटिश अधिकाऱ्यांची, भारतीयांच्या तुलनेत असणारी अवाढव्य मिळकत, हे गांधींच्या स्वातंत्र्यलढ्याचे कारण होते. मग, सामान्य भारतीयांची आजची दैनंदिन व मुकेश अंबानींची दैनंदिन मिळकत यातील फरक, हा आपल्या नव्या स्वातंत्र्यलढ्याचे कारण का होऊ शकत नाही? विशेष म्हणजे, हा फरक सांगून, देशाच्या व्यवस्थेला आवाज देणारा कोणी गांधीदेखील आज नाहीये!

**हिंदुत्ववादी नथुराम गोडसेकृत, गांधी हत्या दिनी, आर्थिक विषमता सांगणाऱ्या गांधीजींचे हे महत्त्व कोणी समजून घेईल का?**

मार्क्सवादाकडून व्हाया 'माफुआं' ते सौत्रांतिक मार्क्सवाद, असा टप्पा गाठलेले शरद पाटील, १९व्या शतकाच्या उत्तरार्धातील न्यायमूर्ती रानडे यांचा हवाला देऊन सांगतात की, भारतात ब्राह्मण व मराठा वा तत्सम लष्करी जाती यांची युती तुटणार आहे. उधळ्या लष्करी जातींची जागा मितव्ययी बनिया घेतील. प्रामुख्याने या मितव्ययी बनिया जातीतून, भारतातील उद्योजक निर्माण झाले आहेत. त्यांचा उदय अर्थातच इंग्रज काळात झाला. अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजय गाडगीळ यांचा हवाला देऊन, शरद पाटील पुढे सांगतात की, भारतातील उद्योजक हे वर्ग नसून, 'इंडियन बिझनेस कम्युनिटी' आहेत. भांडवलदार वर्ग वेगळा व बिझनेस कम्युनिटी वेगळी. बिझनेस कम्युनिटी हा शब्दप्रयोग, जातीसंस्थेने प्रभावित झाला आहे; म्हणून, इंडियन बिझनेस कम्युनिटी, जुनी जातीसंस्था संपवायला तयार नाही. या बिझनेस कम्युनिटीचे प्रतिनिधी असलेल्या महात्मा गांधींशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे, याच मुद्द्यावर मूलभूत मतभेद होते.

या विवेचनाचा सारांश असा की, आज देशात 'इंडियन बिझनेस कम्युनिटी' व ब्राह्मण यांची युती राज्य करीत आहे. गांधीवादाचा प्रभाव असलेल्या स्वातंत्र्योत्तर काळात, या युतीने रेड्डी, मराठा, पटेल, राजपूत, जाट वगैरे मधल्या जातींना मुकादम म्हणून नेमले. मुकादम हा कामगारच असतो; परंतु, तो मालकाचा 'एजंट' म्हणून काम करतो. गावातील ओबीसी, अनुसूचित जाती-जमाती व धार्मिक अल्पसंख्य यांच्याकडून गावगाडा चालवून घेणे, हे या मुकादमांचे मुख्य काम. बक्षीसी म्हणून, पूर्वी त्यांना राज्यस्तरावरील सुभेदारी मिळत असे. हल्ली तिथेही रा. स्व. संघाने अतिक्रमण केले आहे. त्यामुळे मुकादम मंडळी अगदी शेपटापासून गार पडली आहेत. म्हणून, विदूषकी चाळे करीत ब्राह्मण्यवादापुढे लोंडा घोळणे व शेपूट हलवून आपली इमानदारी सिद्ध करणे, यातच ते आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता समजू लागले आहेत. त्यांना संतोष देशमुखांची निषेधार्ह हत्या दिसते; परंतु, त्याहून गंभीर व निषेधार्ह असलेल्या शेतकऱ्यांच्या स्वहत्या दिसत नाहीत. त्यामुळे देशातील आर्थिक विषमता दूर करणे सोडाच, ते स्वजातीय शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठीही काहीच करुशकत नाहीत!

याच पार्श्वभूमीवर दि. १ फेब्रुवारी-२०२५ रोजी देशाचा अर्थसंकल्प जाहीर झालाय. या अर्थसंकल्पाचा अभ्यास करुन, आर्थिक विषमता जनतेला समजावून सांगणे, हे या परमपूज्यनीय देशातील सर्वजातीय-सर्वधर्मीय विवेकशील नागरिकांचे कर्तव्य आहे. निदान यासाठी तरी गांधीजींची आठवण करायला पाहिजे!

*- शुद्धोदन आहेर*

# 'नाइन्टीन एटीफोर' आजही कालातीत, सार्वकालिक वास्तवाचा आरसा

**जॉर्ज ऑर्वेल यांनी, 'नाइन्टीन एटीफोर' ही कादंबरी १९४८ साली लिहिली, ती १९४९ साली पुस्तकरुपात प्रकाशित झाली. तेव्हा ती समकालीन होती आणि आज २०२० सालीही ती समकालीनच आहे. १९४९मध्ये या कादंबरीत भविष्यकालीन स्थिती वर्णिली आहे. ३६ वर्षांनंतर जग कोणत्या स्थितीत असेल, याची कल्पना केली आहे, असे काही तत्कालीन वाचकांना वाटले असेल. काहींना ३६ वर्षांनंतरच्या जगाची नव्हे; तर, आजच्याच जगाची स्थिती या कादंबरीत दाखवली आहे, असेही वाटले असेल. १९८४ नंतरच्या ३६ वर्षांमध्ये ही कादंबरी, १९८४च्या आसपासचीच केवळ नव्हे; तर, कालच्या, आजच्या आणि १९८५पासून २०२०पर्यंतची आहे, असे पुष्कळ वाचकांना वाटल्याचे दिसलेले आहे. गेली सत्तर वर्षे ही कादंबरी लोकांच्या नुसत्या स्मरणात नव्हे; तर, वाचनात आहे. कारण, कोणत्याही काळातल्या वाचकाला, ती आपल्याच आजच्या काळाचा आलेख दाखवणारी आहे असे वाटलेले आहे.**

हिटलरशाही, स्टॅलिनशाही, धार्मिक हुकूमशाही या वस्तुस्थिती आहेत आणि त्यांचीच रुपांतरे, जगात अनेक ठिकाणी अनुभवास येत गेलेली आहेत. केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे; तर, आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक क्षेत्रांतही, कुणीतरी आपल्यावर पाळत ठेवून आहे, याची जाणीव दिवसेंदिवस तीव्रतेने होऊ लागलेली आहे. 'नाइन्टीन एटीफोर'मधले 'बिग ब्रदर इज वॉचिंग यू' हे वाक्य आज कोणत्या ना कोणत्या रुपात आणि सर्वत्रच प्रत्ययास येत राहते. इतरही काही गोष्टी, आज आपल्या वास्तवाच्या भाग झालेल्या आहेत, त्यांचा उच्चार या कादंबरीत झालेला आहे. दमनकारी सत्ता, दोन अधिक दोन बरोबर पाच म्हणायला लावत असते. बहुसंख्य जनता, त्यात बुद्धिजीवी, विचारवंत, मध्यमवर्गीयही आले, ते मान्य करते. **परंतु, अशाही काही व्यक्ती असतात, ज्यांना दोन अधिक दोन बरोबर चार हेच म्हणायचे असते, 'नाइन्टीन एटीफोर'मध्ये दोन अधिक दोन बरोबर पाच म्हणणारी सर्वंकष सत्ता आणि दोन अधिक दोन बरोबर चार म्हणू पाहणारी सामान्य व्यक्ती, यांच्यातला विक्राळ संघर्ष आहे. या संघर्षात ही व्यक्ती पराभूत होणार, हे वाचकाला आधीपासूनच माहित असते, तसे त्याने गृहीत धरलेले असते. अर्थातच त्या व्यक्तीचा पराभव म्हणजे, डोके ताळ्यावर ठेवू पाहणाऱ्या सर्वच व्यक्तींचा पराभव, हेही माहीत असते. एका अर्थाने वाचक स्वत:च्याच शोकात्म पर्यवसनाची कहाणी वाचत असतो !!!**

*- वसंत आबाजी डहाके*

# ‘धर्मराज्य पक्षा’च्या ‘ईव्हीएम’विरोधी आंदोलनाला, उद्धव ठाकरेंचा पाठींबा!

...पृष्ठ क्र. १ वरुन

या भेटीदरम्यान प्रचलित ‘ईव्हीएम’वरील (EVM) अत्यंत संशयास्पद व शंकास्पद मतप्रक्रियेसंदर्भाने सखोल चर्चा झाली आणि ठाणे-जिल्हा प्रीपेड स्मार्ट मीटर (घरगुती इलेक्ट्रिक मीटर) विरोधी समितीला लवकरच भेटीसाठी बोलावण्याचं आश्वासन दिलं.

बैठकीत मा. उद्धवजींनी EVM मुद्द्यापलिकडे जाऊन मतदानासंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण मुद्द्यांना स्पर्श केला व उपस्थित सर्वांना एकूणच मतप्रक्रियेबाबत मोलाचं मार्गदर्शन केलं. राजन राजे यांनी सत्ताधारी भाजप-NDA आघाडी, ‘प्रजासत्ताका’चा अमृतमहोत्सव (वर्ष १९५० ते वर्ष-२०२५) साजरा करण्याबाबत पूर्णतया उदासीन असण्यामागे, त्यांचा ‘प्रजासत्ताक-संकल्पने’लाच (प्रजा म्हणजेच जनता, देशाची मालक असण्याच्या लोकशाही-तत्त्वाला) मुळातून विरोध असल्याचा मुद्दा ठासून मांडला...मुठभरांच्या हातात सत्ता केंद्रित करण्याची, वर्णवर्चस्ववादी-शोषक मानसिकता असणाऱ्यांचा भाजप हा पक्ष असल्यानेच, ते घडत असल्याचंही त्यांनी सांगितलं. तसेच, EVM हॅक अथवा मॅनेज (प्रोग्रॅम्ड) होवोत वा न होवोत...आता, जनतेला पूर्वीचीच कागदी-मतपत्रिकेवरील पारदर्शक-मतदानप्रक्रिया हवी असल्याचं, राजन राजे यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केलं व त्यासंदर्भात ‘धर्मराज्य पक्ष’ मोहिम राबवत असल्याचं व प्रजासत्ताकाच्या अमृतमहोत्सवदिनी म्हणजेच, २६ जानेवारी-२०२५ रोजी रात्रौ ठीक ९.०० वा. फक्त ५ मिनिटे ‘ईव्हीएम’चा निषेध म्हणून सर्व घरातील लाईट्स बंद ठेवण्याचं आवाहन केलं जात असल्याचंही...मा. उद्धवजींच्या कानावर घातलं.

याचसंदर्भात, राहुल चिमणभाई मेहता यांनी बनवलेल्या ईव्हीएम-मशीनद्वारे अमित उपाध्याय, मेघराज जोशी यांचा चमू (Team), ‘ईव्हीएम’ (EVM) कसं ‘मॅनेज’ केलं जाऊ शकतं (भले हॅक होऊ शकत नसलं तरी)...याचं प्रात्यक्षिक आयोजित केल्यास त्यास उपस्थित राहण्याची माहितीही शिवसेना पक्षप्रमुखांना दिली. त्यावर, मा. उद्धवजींनी त्यादिवशी मुंबईत असल्यास, सदर कार्यक्रमाला आवर्जून येण्याचं आश्वासन दिलं.











# कुंभमेळा : सरकारने खर्च करावा का?



कुंभमेळा हा, आपल्या भारतीय परंपरेचा भाग असल्याने, तो होण्याविषयी तक्रार नाही. ज्यांची श्रद्धा आहे त्यांनी जरूर जावे; पण, धर्मनिरपेक्ष सरकारने अशा एका धर्माच्या उत्सवावर किती खर्च करावा?

२०१३ साली कुंभमेळ्यावर १३०० कोटी...

२०१९ साली कुंभमेळ्यावर ४२०० कोटी...

२०२५ साली कुंभमेळ्यावर ७५०० कोटी खर्च केंद्र व राज्य सरकार करत आहे.. त्यात केंद्र सरकारने २१०० कोटी; तर, उत्तरप्रदेश सरकारने ५४०० कोटी खर्च केले आहेत आणि विशेष म्हणजे, उत्तरपदेश सरकारच्या बजेटमध्ये ८६ हजार कोटींची राजकोषीय तूट असताना, सरकार हा खर्च करत आहे...

नेहमीप्रमाणे यातून मोठ्याप्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळते, असा युक्तिवाद केला जाईल. तो योग्यही आहे; कारण, २ लाख कोटींची उलाढाल होऊन, रोजगार व उद्योगाला चालना मिळते, हे अर्थतज्ज्ञही मांडत आहेत...

मुख्य प्रश्न वेगळा आहे की, धर्मनिरपेक्ष असलेल्या सरकारने, हा खर्च करणे योग्य आहे का? कुंभमेळ्यामध्ये जर, २ लाख कोटींची उलाढाल होत असेल तर, मंदिरासारखे ट्रस्ट किंवा प्राधिकरण निर्माण करायला हवेत. त्यांनी तेथे तिकीट लावून विविध सेवांना किंमत लावून हा खर्च वसूल करावा व त्यातून घाटदुरुस्ती पासून इतर खर्च करावेत. हे प्राधिकरण तेथील महापालिका प्रशासन अधिकारात असेल व दोघांनी मिळून ती व्यवस्था करावी; मात्र, तो पैसा तेथे येणाऱ्या भाविकांकडून वसूल करायला हवा...

पोस्ट न वाचता हाज यात्रेला पैसे दिलेले चालतात का? असे अर्धवट कमेंट येतील. त्यांना हे माहीत असायला हवे की, कोणत्याही भाजप सरकारने ती रक्कम बंद केली नव्हती. लांगुनचालन केले होते. शेवटी सर्वोच्च न्यायालय उतरले व ती रक्कम बंद झाली. त्याचे स्वागत करणारे आज गप्प का? त्यांनी याविषयी बोलायला हवे. अयोध्येत महाराष्ट्र सरकार महाराष्ट्र भवन बांधते किंवा तीर्थयात्रा करण्यासाठी अनुदान देते, त्यालाही विरोध करायला हवा... कोणत्याही धर्माचे असे सण/उत्सव, तीर्थ असतील तर, तेथे सरकार खर्च करणार नाही अशीच भूमिका घ्यायला हवी. तेथे रोजगार निर्माण होतो हे उत्तर चुकीचे आहे; कारण, प्रश्न शासन म्हणून एका धर्मासाठी खर्च करावा का? हा आहे आणि रोजगार निर्माण होत असेल तर, प्राधिकरण निर्माण करून त्यांनी जमा व खर्च करायला हवेत...

प्रत्येक बजेटमध्ये तीर्थक्षेत्र विकासासाठी मोठा निधी असतो. तेही गैर आहे. सरकारने तेथे जाणारे रस्ते चांगले करावेत. तेथील महापालिकेने नागरी सुविधा द्याव्यात; पण, तीर्थक्षेत्र विकास हा त्या देवस्थानाने करायला हवा. त्यासाठी त्यांनी दर्शनासाठी तिकीट लावले तरी हरकत नाही. पोट भरलेल्या श्रीमंतांना फुकट जेवण व स्वस्त राहण्याची सोय करण्याची गरज नाही... पुन्हा महाराष्ट्रात 'अ' वर्ग, 'ब' वर्ग, 'क' वर्ग, 'ड' वर्ग अशी देवस्थाने मंजूर केली जातात व निधी मिळतो, हा मोठा गैरव्यवहार आहे. अगदी खेड्यापाड्यातही आज अनेक देवस्थानांनी या पैशातून भक्तनिवास उभी केली आहेत... खूप छोट्या गावात मोठी भक्त निवास खूप हास्यास्पद दिसतात... कोणीही तेथे राहायला येत नाही. गावातील परगावी राहणारे लोक आपल्या घरी येतात, इतकी उधळपट्टी सुरू असते. पुन्हा आमदार निधी खासदार निधीतून मंदिरांना सभा मंडप बांधून दिले जातात. निवडणुकीत त्याचा उपयोग होतो. गावाची सहानुभूती मिळते... शासकीय पैशाचा हा गैरवापर आहे. गावचा रस्ता धड नसतो. गावातील शाळेला चांगल्या खोल्या नसतात आणि इकडे टोलेजंग सभामंडप दिसतात... त्यामुळे धर्मनिरपेक्ष सरकार असताना, हे सारे खर्च बंद होऊन ती रक्कम शाळा, पाणी, रस्ते, रोजगारनिर्मिती यावर खर्च व्हायला हवी...

मंदिर-मशीद, चर्च, गुरुद्वारा येथे कोठेही सरकारी पैसा जायला नको. यानिमित्ताने, सरकारी पैशाने होणारे पर्यटनही थांबले पाहिजे. तिरुपती, अयोध्या, पंढरपूर, शिंगणापूर, शिर्डी अशा प्रसिद्ध ठिकाणी, दर महिन्याला मंत्री अधिकारी येत असतात. त्यांचा खर्च कोण करते? प्रवास-खर्च सरकार करते आणि अनेकदा त्या त्या विभागाचे अधिकारी वर्गणी करुन यांना पुण्य मिळवून देतात... त्यातून त्यांना मग इतर मार्गाने पैसे मिळवण्याचा परवाना मिळतो. कारण, आम्हाला खर्च करावा लागतो. त्यामुळे हिंदू-मुस्लिम अशी बाष्कळ चर्चा न करता, या विषयावर धर्मनिरपेक्ष शासन आणि असे धार्मिक प्रसंग कसे हाताळावे अशी चर्चा व्हायला हवी... आजच्या विकृत झालेल्या वातावरणात तशी होणे कठीण असले तरीही !!!

*– हेरंब कुलकर्णी*

---



*वर्ष-२०२५ या नूतनवर्षाच्या पूर्वसंध्येला, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नौपाडा विभागाच्यावतीने, दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी, रात्रौ ९:०० वा. पासून ते रात्रौ १२:०० वा. पर्यंत ''नववर्ष स्वागत-संध्या'' या सुमधुर गाण्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नौपाडा विभागप्रमुख श्री. प्रकाश पायरे यांनी, ज्येष्ठ नागरिक बालक-पालक कट्टा, बेडेकर शाळेजवळ, नौपाडा, ठाणे (प.) याठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी मा. राजन राजे यांनी, कार्यक्रमाला आवर्जून उपस्थिती दर्शविल्याबद्दल, आयोजकांच्या वतीने, मा. राजन राजे यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. दरम्यान, नववर्षाचे स्वागत करण्यासाठी नौपाडा परिसरातील स्थानिक नागरिकांनी मोठ्याप्रमाणात उपस्थित राहून, सुमधुर गाणी ऐकत केशरी दुधाचा आस्वाद घेत, २०२४ या गतवर्षाला निरोप दिला. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा अध्यक्ष राजेश गडकर आणि महासंघाचे सचिव समीर चव्हाण उपस्थित होते...*

# कसं वाढवायचं यांना...?

**काय करू या मुलाचं? काही कळत नाही! कितीही सांगितलं तरी ऐकत नाही... सांगायला गेलं तर उलटा अंगावर धावून येतो आणि वाटेल त्या वस्तू भिरकावून देतो... अंगाला कुठेतरी लागेल, दुखापत होईल, याची कुठलीच काळजी किंवा तमा बाळगत नाही!! कसं करायचं डॉक्टर तुम्हीच सांगा आता... –असे सांगणारे पालक जेव्हा काय आणि कसं करू या मुलांचं? असे प्रश्न विचारतात तेव्हा एक गोष्ट नक्की झालेली असते की, अशी मुलं–मुली बिघडत चाललेली आहेत आणि ती हाताबाहेर जाऊन गुन्हेगारी प्रवृत्तीकडे त्यांची वाटचाल सुरू झालेली आहे, असे समजावे.**

लहान मुले–मुली गुन्हेगार बनतात, त्याच्यामागे दोन्ही गोष्टींचा हात असतो. परिसर किंवा संस्कार आणि जन्मताच असलेला स्वभाव. इंग्रजीमध्ये याला जेनेटिक आणि एन्व्हायरमेंटल कारणे म्हटलं जातं.

जेव्हा संस्काराची गोष्ट निर्माण होते, तेव्हा मुले–मुली लहानाचे मोठे होत असताना त्यांच्यावर कोणत्या पद्धतीने संस्कार केले तर, ते जबाबदार नागरिक बनतील याचे काही गणित असते. यात एक गोष्ट मात्र महत्त्वाची लक्षात ठेवावी लागेल ती म्हणजे, मुलाला जन्मताच कोणताही मेंदू दोष नाही याची खात्री असणे.

जेव्हा मुलांची वाढ सुरू होते, तेव्हा त्यांची मानसिक वाढ निरोगी पद्धतीने व्हावी यासाठी आपणाला कशा पद्धतीने संस्कार करायचे त्या पद्धती माहिती असणं गरजेचं आहे. अन्यथा, अशी मुले समाज विघातक वर्तन करावयास मागेपुढे पाहत नाहीत.

**पहिली संस्काराची पद्धत असते ती म्हणजे, कडक शिस्तीचे नियम लादणे. बऱ्याच वेळा अनेक आया मला असे म्हणत असतात की, 'याच्या बापाला कधीही मुलांचं काही ऐकायचं नसतं आणि त्यांचं काय चाललंय–काय नाही चाललंय हे बघायचं नसतं. पण, काही चुकलं तर, मुलांना धरून बडवायचं एवढंच जमतं. मग सांगा बघू मुलं कशी शहाणी होणार?'** ही जी पद्धत आहे संस्कार करण्याची, ती फक्त बापच करतो असे नाही तर, आयादेखील करतात. या पद्धतीत पहिली गोष्ट म्हणजे, बंधने घातली जातात. बंधने घातल्यामुळे मुले सरळ होतील असा कयास असतो. दुसरी गोष्ट म्हणजे, गंभीर अशा शिक्षा अमलात आणणे. ज्यामध्ये जिभेला चटके देण्यापासून ते एका पायावर दोन–दोन, तीन–तीन तास उभे राहायला सांगणे, वगैरे. हा एक प्रकारचा छळच असतो. तिसरी गोष्ट म्हणजे, आम्ही, म्हणू तेच करायचं आणि का करायचं ते विचारायचं नाही, असा अघोरी आदेश असतो. या ठिकाणी पालकांनी आपल्याला असे का करायला लावले असे कोणतेही कारण पालक देत नाहीत. त्यामुळे मुला–मुलींमध्ये मानसिक गोंधळ कायम राहतो. एवढेच नव्हे तर, आमच्या खानदानात आणि घरात कधीही असल्या गोष्टी खपवून घेतल्या गेल्या नाहीत म्हणून आम्ही सांगू ते करायचे असे सुनावले जाते.

वागा–त्याप्रमाणे जगा–उत्कर्ष साधा असे सूत्र यामागे असते. पण, वागण्यासाठी जेव्हा पालक जे सुचवतात, ते विवेकी व शहाणपणाचे असेलच असे नाही आणि त्यात जर उणीवा असतील तर, पुढचे जगणे कठीण होते. अशा संस्काराच्या पद्धतीचे गुणगान गाताना असेही सांगितले जाते की, जर त्यांना आम्ही मानसिक पातळीवर संकटांची ओळख आत्ताच करून दिली, ताणतणाव दिले; तर, उद्या आयुष्यात जर अशा घटना घडू लागल्या की, ज्याच्यामुळे मोठी संकटे निर्माण होऊन मानसिक स्वास्थ्य बिघडू शकते, तेव्हा अशा संकटांना ते सहज तोंड देऊ शकतात. पण, वास्तवात असे घडत नाही. जर संकटांना कसे तोंड द्यायचे याची कौशल्येच माहिती नसतील; तर, निव्वळ त्यांना तणावाची ओळख करून दिल्यामुळे ते संकटांना तोंड देतील असे घडत नाही. शिवाय समाजात वावरताना कशा पद्धतीने वावरायचे याचे कोणतेच अनुभव त्याला मिळत नाहीत. कारण, पालकांनी सांगितले तसेच फक्त वागायचे एवढेच डोक्यात असते. अशावेळी असे वागणे समाजात फिरताना अडथळ्याचे ठरू शकते आणि त्यातून वाद–विवाद, तणाव किंवा स्वतःबद्दलची कमीपणाची भावना मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकते.

**कडक शिस्तीच्या आई–बाबांमुळे सातत्याने मनात तणाव राहतो. काही वेळा चिडलेपण मनात घर करून राहते. सातत्याने हे करू नकोस ते करू नकोस, नाहीतर मार खाशील, असे म्हणत राहिल्याने प्रचंड अवसानघातकी आज्ञाधारकपणा निर्माण होतो. यातून डिप्रेशन आणि काळजी विकृती निर्माण होत जाते. तणावाखाली राहिल्याने समाजविघातक विचार सुद्धा डोक्यामध्ये येऊ शकतात. बऱ्याच वेळा स्वतःला दोष देण्याची प्रवृत्ती मोठ्याप्रमाणात बळावते. त्यातून कोणत्याही कठीण प्रसंगात निसटून जाण्याची प्रवृत्ती, पळ काढण्याची वृत्ती निर्माण होते आणि प्रत्येक गोष्ट टाळण्याकडे कल झुकतो. यातून एकटेपणाची, अपराधीपणाची भावना मनात जर रुजली तर, व्यसनांकडे वळण्याचे प्रमाण वाढू लागते. स्वतःमध्ये कोणतीही कौशल्यं नाहीत, संकटना तोंड देण्याची क्षमता नाही, प्रत्येक ठिकाणी कमी पडतोय याची भयंकर जाणीव आहे, अशी जेव्हा मनस्थिती तयार होते, तेव्हा आत्महत्याही घडू शकते. दक्षिण कोरिया, भारत आणि चीन या आशियाई देशांमध्ये अशा प्रकारचे पालकत्व करण्याची पद्धत मोठ्या प्रमाणावर आहे आणि म्हणूनच लहान मुला–मुलींमध्ये आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाणदेखील मोठ्याप्रमाणावर आढळते.**

या पद्धतीच्या संस्कारांमध्ये पालक मुलांकडून अपेक्षा खूपच ठेवतात. त्या व्यक्त करूनही दाखवतात. पण ज्या पद्धतीने मुलांशी वागून, त्यांना मदत करून पुढे जायला शिकवणे गरजेचे असते ते काही केले जात नाही. त्यामुळे अशी मुले सर्वस्वी पालकांवर अवलंबून राहतात. चूक काय आणि बरोबर काय याच्यासाठी ते नेहमी पालकांच्या तोंडाकडे बघत राहतात. जेव्हा मोठे होतात तेव्हा अशी मुले–मुली हे आपल्या आई–बाबांचा सल्ला घेण्याचा सपाटा चालू ठेवतात. आणि त्यातून गंभीर कौटुंबिक गुन्हे घडत जातात.

स्वतंत्रपणे स्वतः विचार करणे ही गोष्ट करू दिली जात नसल्यामुळे मानसिक अपंगत्व मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. अशी मुले–मुली ही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या नायकाच्या प्रभावाखाली आल्यास, त्याचे नेतृत्व सहजपणे मान्य करतात व त्याला पाठिंबा देतात.

पालकत्वाचे अशा प्रकारचे संस्कार करणे ही गोष्ट अनेक घरांमधून घडत असेल; तर, ती थांबवणे इष्ट ठरेल. मुला–मुलींवर संस्कार करणारी दुसरीही एक पद्धत असते तिचा विचार आपण पुढच्या लेखात करूया...

**– डॉ. प्रदीप पाटील** *(समाजमाध्यमातून साभार...)*



*जगविख्यात अर्थतज्ज्ञ, भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर आणि भारताचे माजी पंतप्रधान, डॉ. मनमोहन सिंग यांचे, दि. २६ डिसेंबर–२०२४ रोजी, दुःखद निधन झाले... त्यानिमित्ताने ठाण्यातील वसंतराव नाईक सभागृहात, दि. ३ जानेवारी–२०२५ रोजी, सर्वपक्षीय शोकसभेचं आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी उपस्थित राहून, आपल्या सहवेदना व्यक्त करीत, डॉ. मनमोहन सिंग यांना श्रध्दांजली अर्पण केली.*

# सध्याचं राजकारण : केवळ पैसा आणि प्रसिद्धीसाठीच.....

**आपण सध्या घोटाळयांनी वेढलेल्या आणि भ्रष्टाचाराच्या अत्युच्च शिखरावर असलेल्या देशात राहतोय याबद्दल कुणाचंच दुमत नसावं. मला या गोष्टीची खूप लाज वाटतेय आणि खूप निराशाही आलीय की आपण जे आपलं मत देतोय ते मत म्हणजे केवळ या लोकांच्या दहा पिढ्यांचं कल्याण करण्याचीच परवानगी देतोय की काय ! या नेत्यांना आम्हा सामान्य जनतेबाबत काडीचीही आस्था नाही. हे केवळ असच मानत आलेत की आपल्याला भ्रष्टाचार नी घोटाळे करायला अधिकृत परवानगी देणारे (मतदान) हे खुळे लोक. बस्स !!! या व्यतिरिक्त काहीही नाही.**

खरंतर हा दोष त्यांचा नसून आपलाच आहे. आपण यांना सुतासारखं सरळ ठेऊ शकतो; पण, आपण केवळ मत देऊन गप्प बसतो. पण, आत्ता मात्र, हेच करण्याची वेळ आली आहे आणि ही शेवटची संधी जर आता गमावली तर, पुढे आपलं नि आपल्या या देशाचं काय होईल याची स्वप्नात सुद्धा आपण कल्पना करू शकणार नाही. आपली पुढची पिढी किती वाईट नि हलाखीत दिवस काढेल याचीही कल्पना करू शकत नाही.

आपल्या देशात राजकारणातून पुढे आलेले असे अनेक नेते आहेत की, ते नेते नसून देशाला लागलेली कीड वा कलंकच आहेत. सध्या सत्तारूढ पक्ष आणि त्यांना टेकू देणारे लेचेपेचे बांबूपक्ष आणि बाकी सारे विरोधी या साऱ्यात हे कलंक आहेत. यांना आपण बरोबर हेरणं गरजेच आहे. भले ते पैशाने कितीही मोठे असोत, यांना आपण आपलं अमूल्य मत देता कामा नये. या किडींना वेळीच जहाल विष घालून ठारच मारलं पाहिजे. कारण यांचं प्रमाण आता पन्नास टक्केहून जास्त झालंय आणि अख्खा देश यांनीच पोखरून टाकलाय. आपली अवस्था सध्या कशी आहे ती पहा! आपल्याला सगळ्यांना हे घोटाळेखोर कोण आहेत हे माहित आहे, पण आपण यांचं काहीही करू शकत नाही, यांच्या केसालाही धक्का लावू शकत नाही अगदी खूप काही करायची इच्छा असूनही. माझ्या तर मनात असही आहे की, यांना पकडावं, यांची बँकखाती सील करून सगळे पैसे सरकारी तिजोरीत जमा करावेत, हे सगळ्यात महत्वाचं आणि यांना जेलमध्ये साधं जेवण देऊन जगवावं. कारण काय तर, दुसऱ्यांना पण भीती वाटली पाहिजे याची आणि वर त्यांच्याच तोंडून जगाला सांगायला लावावं की, मी फार चूक केलीय, मी तुम्हा जनतेला लुटलंय, याची शिक्षा मी भोगतोय, अशा चुका बाकीच्यांनी करू नका. पण हे सगळ फक्त माझ्या मनात आहे, प्रत्यक्षात मी काहीही करू शकत नाहीय. असचं तुमचंही असेल ना.तेव्हा आत्ताच जागण्याची वेळ आलीय.

दुसरं म्हणजे, हे विविध पक्षांचे लोक २०१४च्या निवडणुकीत एनकेनप्रकारेण सत्ता हासील करण्यासाठी एवढा पैसा ओतणारेत की बस्स.. हा पैसा जर दुष्काळ असलेल्या गावांमध्ये ओतला गेला तर, पुरा भारत कायमसाठी सगळ्या प्रकारच्या दुष्काळातून मुक्त होईल. पण नाही, हे असं करणारच नाहीत. केलं तर ते नेते कसले? साधी गोष्ट पहा, रस्ते करणारे कंत्राटदार चांगला रस्ता करणारच नाहीत; कारण, तसा केला तर, दरवर्षी त्याला काम कसं मिळेल आणि लाखो-करोडो रुपयांवर त्याला पाणी सोडाव लागेल. बरं यात तो एकटा थोडाच आहे - यात शिपायापासून ते कनिष्ठ, वरिष्ठ अधिकारी, नगरसेवक, मंत्री, आमदार, खासदार नि त्यांचे कार्यकर्तेही भागीदार असतातच. किंबहुना बाकीच्याही पक्षाचे लोक यात भागीदार असू शकतात.

कारण, यात ते थोडं माझं भलं, थोडं तुझं भलं या भावनेने एकत्र आलेले असतात. हे असे सगळे लबाड लोक एकत्र येऊन देशाचा सत्यानाश करत आहेत. मी फक्त एक रस्त्याचेच उदाहरण दिले आहे. हे लोक हा रस्ता तुम्हा-आम्हासाठी करतच नाहीत, यांच्या अलिशान गाड्यांसाठी हे रस्ता करतात आणि मुख्य म्हणजे पैसा खाण्यासाठीचा तो एक अधिकृत मार्ग असतो म्हणूनच निव्वळ तो रस्ता होत असतो. हे राजकारणी एवढे निर्ढावलेले आहेत की, यांना सामान्य माणूस दिसतच नाही, मा. अण्णा हजारे म्हणतात तसे हे सत्ता नि पैसा यात मश्गुल झालेले आहेत. याबाबत खरं तर अण्णांनीच आपल्या देशाला जाग केलंय. तो खरा, सच्चा देशवासी, देशभक्त आहे, त्यांना भारतरत्न किताब द्यायला हवाय. पण आपल्याला हे दिसत नाही, त्याजागी न जाणो, आपल्याला कुणा कुणाची नावं सुचू लागतात की, ज्यांनी देशासाठी काहीही केल नाहीये, फक्त मजबूत पैसा कमावलाय आणि प्रसिद्धी. अण्णांमुळेच आपला नजरिया बदललाय हे एक चांगलं लक्षणच म्हणायला हवं.

लोकतंत्र म्हणजे काय, नुसतं मतदान केल की झालं असं नसून निवडून आलेले नेते नीट काम करतात की नाही, ते करत नसतील तर, त्यांना आपण जाब विचारू शकतो हेही अण्णांनीच आपल्याला ज्ञात करू दिलंय.

खरं तर आपल्याला हे सगळ माहित नव्हतं असं नाही; पण, जाऊ दे, मरू दे, या राजकारणी लोकांच्या नादी लागण्यात अर्थ नाही, असा समज आपण करून घेतला होता; पण, आता आपल्यावर जेव्हा उपाशी पडण्याची, आपलं राहत घर अथवा जमीनच जगण्यासाठी गहाण टाकण्याची वेळ आलीय, तेव्हा आत्तासे आपण भानावर येतोय हेही नसे थोडके. ही वाढती महागाई, रोगराई, लाचखोरी, गुंडाशाही, बलात्कार यामुळे सामान्य जीवन जगणंच जेव्हा आता कठीण झालंय तेव्हा आपण आता विचार करू लागलोय. खाण्याच्या वस्तू आणायला जा त्या महाग आणि भेसळयुक्तच मिळतील, औषधं आणायला जा, ब्रँडच्या नावाखाली कंपन्या दामदुप्पट पैसा घेऊन कशा लुटताहेत ते दिसतं, कामासाठी कुठल्याही ऑफिसमध्ये जा,तो माणूस असा अडवेल की लाच हवीय हे सांगायलाही त्याला लाज वाटत नाही आजकाल.

तुम्ही ज्यांना निवडून देता, ते लोकच तुमच्यावर गुंडे, मवाली सोडतात, त्यांच्याकरवी मारहाण करतात आणि मग आपण भीतीने आपलं घर सोडतो, जमीन सोडतो, अशी ग्रामीण भागातली आजची स्थिती आहे. कोर्टात जा, तिथे तुम्हाला म्हणजे, सत्याला न्याय मिळणारच नाही अशी सत्यस्थिती आहे. या सगळ्याच्या पाठीमागे नाही, तर सगळ्यांपुढे राजकारणी लोकच आहेत, हे आता जगजाहीर झाले आहे. आपला देश हा कृषिप्रधान आहे, असं आपण लहानपणी शालेय पाठ्यपुस्तकात वाचलेलं आहे; पण, आज तो तसा कुठे आहे? तुम्हाला खूप हसू येत असेल, जेव्हा आपले कृषी संबंधातील नेते असं बोलतात की, यंदा खूप आणि छान पाऊस झाला असल्याने पिक भरपूर येईल आणि काहीच दिवसांनी असंही वक्तव्य करतात की, पाण्याचा दुष्काळ असल्याने पिकं कमी येतील तेव्हा लोकांनी पाणी खूप जपून वापरावे. खरंतर दुष्काळ ही दरवर्षी येणारी समस्या आहे, त्यावर शेततळे (waterbank) सारखे प्रकल्प भ्रष्टाचार होऊ न देता किंवा जेवढे पैसे मंजूर झालेत ते १००% तेथे उपयोगात आणले तर, पाण्याचा दुष्काळ कसा राहील? पण, यांना खायलाच पैसा पुरत नाहीय, ते तुमच्या दुष्काळावर पैसा खर्च करतीलच कसे?

सत्ता टिकवण्यासाठी पाठींबा देणाऱ्या पक्षातल्या लोकांमागे CBI लावून सत्ता टिकवणे आणि भ्रष्टाचार केलेला असल्यामुळेच CBI ला घाबरून सत्ताधाऱ्यांना साथ देण्यावाचून साथी पक्षांना पर्याय नाही हाही प्रकार आता जगासमोर आला आहे.

तशाच विरोधी पक्षातील पण काही गोष्टी समोर आल्यात की, सत्ताधारी आणि विरोधी पक्षात घोटाळे नि भ्रष्टाचार करण्यात पुढे कोण? किंवा भ्रष्टाचार उघड झाल्यावरही CBI लाच धमकी देऊन आम्हीही सत्तेत येऊन तुमचे पाहून घेऊ असे जाहीर बोलणे, हेही एक भावी गुंडाशाहीचेच प्रतिक आहे. नाही का? हे असे लोक सत्तेत आले तर, जनतेच्या समस्यांकडे न पाहता कोणी किती त्रास दिलाय याचाच हिसाब-किताब करण्यात वेळ दवडतील यात शंका नाही.

त्यामुळे ज्यांचावर भ्रष्टाचाराचे, खुनाचे, बलात्काराचे, दडपशाहीचे, मारहाणीचे वा अन्य गुन्हे आहेत, असेच लोक आपण आत्तापर्यंत निवडून देत आलोय; मग, या देशाचं काय होणार सांगा बरं. आजकाल आपण मतदान करताना हे पाहतही नाही की, त्यांची ध्येयधोरणं काय आहेत, निवडणूक लढविणारा काय लायकीचा आहे, गुंड, मवाली आहे की, चांगला शिकलेला आणि लायक माणूस आहे, आपण फक्त असं पाहतो की, हा माझा पक्ष आहे किवा या पक्षाचा मी आहे आणि इथेच आपण आत्तापर्यंत माती खाल्लेली आहे. आपल्याला एकही उमेदवार पसंत नसेल तर, नापसंतीचा अर्ज पण मतदानाच्या वेळी भरू शकतो, हेही कित्येकांना अजून माहित नाहीय. मत देण्यात आपण धन्यता समजत आलोय हे खूपच हानिकारक आहे. आणि इथे अण्णानचे विचार मोलाचे ठरतात, त्यांच्यामुळेच आपल्याला Right to Reject and Right to Recall हे शब्द माहिती झालेत. अण्णा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक उपोषणे, आंदोलने केली. त्यांचा या मुर्दाड राजकारण्यांवर काडीचाही परिणाम झाला नाही. उलट यांनी अण्णा आणि सहकाऱ्यामागे CBI सोडली. म्हणून मलाही आता असं वाटू लागलय की, या राजकारणात आता आपल्यासारख्या सामान्य लोकांनीच यायला हवं. या लोकांचं राजकारण आता पुरे झालं. देशाचा सगळा चुराडा करून टाकलाय यांनी. आपणच सत्तेत आलं पाहिजे. पण, राजकारणात येताना काही पथ्य कायम साठी घालून घेतली पाहिजेत, नाहीतर काही वर्षांनी आपणही या राजकारण्यांच्याच पंक्तीत येऊन बसलेलो असायचो. सत्ता हातात आली तरी, सात पिढ्या पोसणार राजकारण आपण करता कामा नये. यासाठी स्वतःला काही नियंत्रणे घालून घेतली पाहिजेत. यासाठी जरा हटके विचार करता, अरविंद केजरीवाल बरोबर वाटतात. आपल्यासारखीच तीही ही एक सामान्य व्यक्ती आहे. त्यांच्या पिढीत कुणीही राजकारणी झालेलं नाही. सार्वजनिक कार्यासाठी देण्यात येणारा मानाचा रेमन मेगासेसे हा जागतिक पुरस्कार मिळवणारा हा माणूस आहे. त्यांनी यातून मिळालेली सगळी रक्कम संस्थेला अर्पण केलीय. हा माणूस आयकर विभागात कमिशनर पदावर काम करायचा.

...पृष्ठ क्र. १२ वर

...पृष्ठ क्र. ११ वरुन

पण, माहितीचा अधिकार हा कायदा नीट बनावा यासाठी, त्याने चांगली नोकरी सोडून त्या कामात स्वतःला झोकून दिले. हा माणूस चांगला शिकलेला आहे, त्याला चांगलं ज्ञान आहे, राजकारणी लोकांनी आणि कंपन्यांनी देशाला कसं लुटलं आहे याची पुराव्यासकट त्याने भांडाफोड केली आहे. शिवाय स्वतः भ्रष्ट नाही. हा एक चांगला आदर्श असू शकेल. या सर्वांना रोखण्यासाठी सरकारने CBI चा वापर केला. पण, हे लोक तावून सुलाखून बाहेर पडले, कारण, कुठे भ्रष्टाचार केलेलाच नाही. हे यांच्याबाबतच माझं स्वतःचं मत आहे. तुमचंही मत कदाचित असंच असेल, असं मी गृहीत धरलंय. तेव्हा अशी फकीर वृत्तीची लोकच देश चांगला चालवतील अशी आशा करायला आपल्याला हरकत नाही. आपल्यासारख्या चांगल्या लोकांनी पुढे येऊन पैशाची, प्रसिद्धीची अपेक्षा न करता, राजकारणात उतरलं पाहिजे आणि तेही सत्ता मिळवणे हाच हेतू ठेऊन. कारण, या धनदांडग्या लांडग्यांच्या हातातून सत्ता हिसकावून घेतल्याशिवाय आता, आपल्याला सामान्य जीवन जगणं सोपं राहिलं नाहीय, हे लक्षात घ्यायला हवं. नाहीतर इथून पुढे सामान्य माणूस अन्नासाठी जर रस्त्यावर उतरला तर, तो कायदा हातात घेतल्याशिवाय राहणार नाही आणि सगळीकडे अराजक माजेल, किंवा भविष्यामध्ये आत्ता आहे त्यापेक्षा खूप भयंकर आणि विपरीत काहीतरी घडणार आहे हे मात्र नक्की. तेव्हा मात्र आजच्या या नेत्यांना पळता भुई थोडी होऊन जाईल. मला आत्ताच जे वास्तव दिसू लागलय, जे योग्य वा अयोग्य वाटलंय त्याचाच मी उहापोह करायचा इथे प्रयत्न केलाय.

सत्ताधाऱ्याचे जे घोटाळे समोर आलेत, त्यात किती जणांना शिक्षा झाली बघा? झाली ती केवळ मामुली शिक्षा. खाल्लेल्या पैशाचं काय? ते सरकारी तिजोरीत जमा होतच नाहीत. ते आपोआप पचून जातायेत. हे एवढे निर्लज्ज झालेत की, जेलमध्ये आरामात बसतात, कारण काय, तर २/३ वर्ष जेलमध्ये बसले तरी, बाहेरची सगळी कामे यांची व्यवस्थित चालू असतात आणि खाल्लेले सगळे पैसे पचतात. कारण, ते परत कोण मिळवणार? सत्ताधारी नेते? कसं शक्य आहे? यात त्यानाही हिस्सा मिळालेला असतो ना !

तेव्हा वाचकहो, माझ्या मनातली ही खळबळ आपल्यासमोर मी व्यक्त केलीय. मी आत्ता याक्षणी कुठल्याही पार्टीची प्रचारक किवा प्रसारक नाही किंवा सभासदही नाही. मतदाराला जागं करणे एवढाच माझा हेतू आहे. आपल्या सामान्य माणसाचाच पक्ष राजकारणात सक्रीय व्हायला हवाय अस मला वाटतंय. राजकारणात मुरलेल्या या मोरावळयांना जराही सत्ता हातात लागू देता कामा नये. कारण, हाती लागलेल्या छोट्याशा सुतानेही हे लोक पुरा कपडा हिसकावून घेतील.

त्यासाठी २००९ सालचं पहिल्या दिवसाचंच (cash for vote) उदाहरण पुरेसं आहे. पहा या लोकांनी पहिल्याच दिवशी झलक दाखवून दिली होती की, आम्ही भविष्यात पैशाच्या आणि सत्तेच्या जोरावर काय काय करणार आहोत आणि तसं ते ४ वर्षात त्यांनी घोटाळयातून करूनही दाखवलं. कर्नाटकात पण सत्तेसाठी भ्रष्ट लोकं कसं राजकारण करताहेत तेही आपण पाहतोय. उत्तरप्रदेश, दिल्ली, बिहार, महाराष्ट्रातही सत्तेतील लोकांच्या पाठबळावर खुनी, बलात्कारी, गुंड लोक वाट्टेल तसा, वाट्टेल त्या क्षेत्रात, खुलेआम धिंगाणा घालून आपल्याला हवी ती गोष्ट सामान्य जनतेकडून हिसकावून घेत आहेत. याला आपल्याजवळ उत्तर एकच आहे. आपणच राजकारणात शिरुन देशाला मोठं करायचं. आत्ताचा हेलिकॉप्टर घोटाळा, कोळसा घोटाळा, वीज घोटाळा, पाणी घोटाळा, सिंचन घोटाळा, चारा घोटाळा, रोजगार घोटाळा, जमीन घोटाळा, खनिज घोटाळा, अन्न घोटाळा, औषधं घोटाळा, लवासा घोटाळा, बांधकाम घोटाळा. संरक्षण क्षेत्रातही घोटाळे, भ्रष्टाचार करताना यांना जराही शरम वाटली नाही, जे जवान तुम्हा आम्हा पुऱ्या देशाचं आणि या निर्लज्ज पुढाऱ्यांचेही दिवसरात्र रक्षण करतात त्यांना देण्यात येणाऱ्या गणवेश, बूट, ज्याकेट्स मध्येही घोटाळा? हलक्या दर्जाच्या वस्तू देऊन पैसा खाल्ला? हे पाप यांना याच जन्मी फेडावं लागणारेय हे नक्की. यांनी एकही अस क्षेत्र सोडलं नाहीय की, तिथे भ्रष्टाचार झालाच नाहीय. केजरीवालनी तर हे पुराव्यानिशी दाखवून दिलयं की, आत्ता आपण एखाद्या गोष्टीसाठी जो पैसा देतो ती खरं तर आपल्याला १/२ किंवा १/३ किमतीत मिळू शकते. उदाहरणच घ्यायचं झालं तर, वीज बिल, पाणी बील, पेट्रोल, डीझेल, केरोसीन, घरगुती स्वयंपाकाचा गॅस, भाजीपाला, खाण्याच्या वस्तू, दूध हे सगळ या लोकांनीच जाणुनबुजून महाग बनवलंय. आपण कर भरतोय त्याचा उपयोग हे लोक स्वतःसाठीच करत आलेत. चांगले रस्ते, चांगल्या सोयीसुविधा, २४ तास पाणी, २४ तास वीज आहे कुठे? पुरेसं अन्न गरिबांना आहे कुठे? स्वस्तातील घरे गरिबांना आहेत कुठे? सगळा पैसा हे मोरावळे, अनेक कंपन्यांचे म ालक, आणि अधिकारीवर्ग हे एकमेकांच्या संगनमताने लुटत आहेत. या लोकांनी एखादी नवीन योजना आणली की, मला हल्ली संतापच येतो कारण तुम्हाआम्हासाठी ही योजना नसून पैसे खाण्यासाठीच यांनी नवीन शोधलेला तो मार्ग असतो. त्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत, गरीब एकदम भिकारी आणि आपण सामान्य लोक दारिद्ऱ्याच्या वाटेकडे चाललोय. या तेल कंपन्या, वीज कंपन्या, गॅस कंपन्या पहा कशा वारंवार दरवाढ करत आहेत त्या! का तर कंपन्यांना घाटा होतो म्हणे. पण, मग यांच्या balancesheet मध्ये प्रचंड फायदा येतो कुठून? ह्या सगळ्या कंपन्या तुमचा आमचा खिसा कापून दिल्लीत बसलेल्या बड्या धेंडाचेच खिसे भरतायत हे सत्य उघड झालंय आता. या कंपन्या जो तोटा झालेला दाखवतात ना तो मुळात तोटाच नसतो. तो खरा फायदा असतो. असा बिनधास्त फसवणुकीचा धंदाच या लोकांनी चालवलेला आहे. आपल्यासारख्या सामान्य लोकांना यांची ही फसवेगिरी कधी कळणारच नाही.

तोंड उघडलं तर, हे राजकारणी चिरडून टाकतील ही भीती आणि तोंड नाही उघडलं तर, महागाई कंबरडं मोडेल ही भीती अशी आपली 'इकडे आड तिकडे विहीर' अवस्था झालीय. जिकडे तिकडे घोटाळेच घोटाळे दिसतायत. सगळ्यात वाईट गोष्ट ही आहे की, घोटाळे उघडकीला आले तरी त्यांना कठोर शिक्षा होत नाही, घोटाळ्यातील पैसा सरकारी तिजोरीत परत जमा होत नाही. बलात्काऱ्यांना कठोर शिक्षा होत नाही किंबहुना ते सापडतच नाहीत, सापडले तरी पुराव्या अभावी ते निर्दोष सुटतात ही सत्यस्थिती आहे. परदेशात काळा पैसा कुणाकुणाचा आहे, हे आपल्याला माहित असूनही आपण त्यांना जाब विचारू शकत नाही किवा त्यांचावर case पण दाखल करू शकत नाही. CBI स्वतंत्र नसल्यामुळे व्यवस्थित तपास होऊ शकत नाही. परदेशातील काळा पैसा भारतात परत आणण हे जर इच्छाशक्ती असेल तर, अजिबात कठीण नाही. भले त्या परदेशी बँका माहिती नाही देतील पण, आपल्या देशातील जे काळा पैसेवाले लोक आहेत त्यांना योग्य तो झाशा दाखवला तर, त्यांच्याकरवीच आपण हा सगळा पैसा मिळवू शकतो. आपल्या देशात पण लपलेलं धन सुध्दा काही कमी नाही. हे सगळं धन जर परत सरकारी तिजोरीत आलं तर, आपल्याला आयकर (income tax)भरावा तर नाहीच लागणार, उलट महागाई पुर्णपणे नष्ट होऊन जाईल आणि भारत एक महासत्ताच होईल. हे माझं स्वप्नातील वर्णन नसून खरोखरच असं होऊ शकेल.

आपल्या देशाला भगवा आतंकवाद म्हणणारा नेता नकोय, पोलीसबल १५ मिनिटांसाठी काढून घ्या, मग पहा १०० कोटी हिंदुंचा कसा खात्मा करतो ते असं म्हणणारा नेता तर आसपासही नकोय, किंवा आपल्या पक्षाचे आणि आपलेच पुतळे उभे करणारही नेतृत्व नकोय, बाहेरून येऊन आम्हा लोकांच्या पैशावर स्विस बँकेमध्ये काळा पैसा लपविणार आणि स्वत:च्या जावयाला सरकारी आणि देशाचाच जावई असल्यासारखा मान देणारी नेतेमंडळीही नकोत आणि त्यांचे पाय चाटण्यात धन्यता मानणारी आणि स्वत्व गमावून बसलेली कुत्री तर नकोच नकोत. तसेच, जनतेला हे वर्ष भारनियमन मुक्त असेल अशी खोटी आश्वासने देऊन दिशाभूल करणारी, चावीवर फिरणारी रोबोसारखी विचारहीन, दिशाहीन कर्तृत्वहीन, स्वत:चा मेंदू गहाण ठेवणारी बुजगावणी पण नकोत. गुंड, मवाली, सामान्यांची जमीन हडपणारी, स्वत:ची पंचतारांकित हॉटेल्स, साखर कारखाने, शाळा कॉलेज काढून पैसा हडपणारी, बेहिशेबी संपत्ती जमा केलेली फालतू लोकं पण नकोयत. किवा दुष्काळात लग्नासाठी करोडो रुपये खर्च करून गरिबांना नाक खाजवून दाखवणारी लोकं तसेच, जातीधर्माच्या नावावर राजकारण करून स्वतःच्या तुंबड्या भरणारेही आपल्याला नकोयत.

आम्हाला हवी आहेत अशी नेतेमंडळी की जी सर्व जातीच्या, सर्व धर्माच्या लोकांना एकत्र आणि बरोबर घेऊन जाणारी आणि यशाच्या वाटेवर सतत मार्गक्रमण करणारी , हुशार, सुशिक्षित आणि धाडसी नेतृत्वगुण असलेली नेतेमंडळी हवी आहेत. जागतिक स्तरावर भारताला मानाचे स्थान मिळवून देणारे, भारताला प्रत्येक क्षेत्रात प्रगती पथावर नेणारे नेतेच आपल्याला हवे आहेत. हे असे अपेक्षित असणारे लोक आपल्यातच अनेक आहेत. मात्र, त्यांनी स्वखुशीने राजकारणात यायचं धाडस करायला हवं. तरच या देशाचा विकास होणं शक्य आहे. नाहीतर पाच-पंचवीस लोकांना हे धेंडे काही ऐकणारे नाहीत हे प्रत्येकानेच लक्षात घ्यायला हवंय.

एकूणच काय तर, आपल्याला सगळ्या गोष्टी माहित असूनही आपण आत्ता काहीही करू शकत नाही आणि म्हणूनच ही सत्ता आपल्या सामान्य माणसाच्याच हाती आली पाहिजे. हेच सत्य आहे. अण्णा जरी कितीही म्हणाले की, सत्तेत जाण आपलं काम नाही तरी या काळाची ती गरज आहे हे ओळखून आपण राजकारणात प्रवेश करायलाच हवा. पण, त्यांच्यासारखं राजकारण मात्र करायचं नाही, नाहीतर त्यांच्यात नि आपल्यात फरक तो काय राहिल? हेही तितकंच खरं आहे. पण, राजकारणात प्रवेश करणं सगळ्यांनाच शक्य होणार नाही म्हणून जे चांगले लोक प्रवेशकर्ते झालेत त्यांना आपण साथ द्यायला हवी. लेखाच्या शेवटी एवढंच सांगेन की, लेख लिहिण्यामागे कोणत्याही पार्टीचं समर्थन नसून, जोपर्यंत सामान्य माणूस राजकारणात सक्रीय होत नाही, तोपर्यंत चाललंय हे असंच चालू राहणार. आपण मात्र, 'जो जन्माला येतो तो कधीतरी मरतोच' ही उक्ती सार्थ ठरवण्याव्यतिरिक्त इतिहासात आपली विशेष अशी कुठलीही नोंद असणार नाही हे ध्यानात घ्यावे.

*एक आशावादी भारतवासी...*

**आधीच मर्कट तशात मद्य प्याला अशी बेफाम अवस्था झालेल्या, या कॉर्पोरेटीय-मर्कटांना आवरा; नाहीतर, यांना बेरोजगारी-अर्धरोजगारीने संत्रस्त झालेला भारतीय तरुणवर्ग भररस्त्यात जोड्याने हाणेल (अमेरिकेतल्या 'युनायटेड हेल्थकेअर'च्या ब्रायन थॉम्सन या CEOचं काय झालं, ते स्मरणात ठेवा)!**

'भांडवलाचा' गुणधर्मच असा (म्हणूनच, कार्ल मार्क्सने आपल्या ऐतिहासिक ग्रंथाचं नाव 'दास कॅपिटल' ठेवलं, 'दास कॅपिटॅलिस्ट' नाही ठेवलं) की, 'अत्युच्चपदी थोर बिघडतो'; तशी अब्जावधी डॉलर्सच्या अन्याय्य-अनितिमान वरकड-कमाईने (Surplus-Value) आणि जवळपास निरंकुश सत्तेने यांची मती फिरलेली असते.

अमेरिकेचा इलिऑन मस्क असो, जेफ बेझोस असो वा असोत भारतातला इन्फोसिसचा नारायणमूर्ती अथवा 'एल अँड टी'चा सुब्रमण्यम हे सगळेच तथाकथित बडे CEO अथवा भांडवलदार, 'विकृत' मानसिकतेचेच उत्तम उदाहरण असतात! तेव्हा, त्यांच्याकडून कुठल्या वेगळ्या अपेक्षा बाळगायच्या? त्यांच्या मेंदुचा एक भाग कमालीचा तल्लख; तर, दुसरा अहंगंड व पराकोटीच्या स्वार्थ-संवेदनशून्य बुद्धीने पूर्ण सडलेला असतोत्या अर्थी, ते आधुनिक 'रावण-बुद्धी'चेच असल्याचं कुणी म्हणाल्यास, किती चुकीचं ठरावं?? यांचीही 'लंका' सोन्याची असतेपण, रावणाच्या सोन्याच्या लंकेत जशी न्यायनीति नव्हती, सत्याचा अपलाप होता; तोच घृणास्पद प्रघात यांच्याही, कुबेराला लाजवणाऱ्या कॉर्पोरेटीय-लंकेत फसफसत असतो. धंदा-व्यवसायातलं यांचं आकलन, शब्दशः लोकविलक्षण असतं; पण, त्यापलिकडे, तंत्रज्ञानालाच ब्रह्मज्ञान समजणारी ही कॉर्पोरेटीय मंडळी, जगण्याच्या आसाला भिडलेल्या समस्यांविषयी बव्हंशी अनभिज्ञ असतात अथवा त्या जाणून घेण्याविषयी ते पूर्णतया उदासीन असतात जणू एका मर्यादित परिघात ते 'शहेनशहा' म्हणूनच मिरवत रहाणं पसंत करतात. कॉर्पोरेटीय क्षेत्रात लोकांक्षा जपणं किंवा लोकशाही रुजवणं म्हणजे, यांच्या बेलगाम शहेनशाहीला ते जणू आव्हानच समजतात त्यामुळेच, कामाच्या ठिकाणी लोकशाहीचा लवलेश शिल्लक न ठेवता, 'कंपनी-दहशतवादा'चं (Corporate-Terrorism) थैमान घालणं, त्यांच्या व्यवस्थापनाचं अविभाज्य अंगच बनतंत्याशिवाय, त्यांची 'शहेनशाही' संबंधित सर्वांच्या छाताडावर कशी बसेल?

विद्यार्थीदशेत अतिरेकी 'अभ्यास' (तो ही बहुशः व्यवस्थापन-शास्त्राला वाहिलेला) आणि जोपासलेली फाजील 'महत्त्वाकांक्षा' यांचं दुपेडी इंधन, आपल्याच बुडाशी लाऊन, स्वतःचं तारुण्य जाळायचं आणि मग, हाती अनिर्बंध कॉर्पोरेटीय-सत्ता येताच (अलिकडे, भांडवलदारवर्गाचं अव्वल प्रतिनिधित्व करणारे कॉर्पोरेटीय CEOs, हे विशिष्ट कॉर्पोरेटीय-परिघातले I am the state म्हणणारे नवे 'राजे-महाराजे'च तयार झालेले दिसतात) कंपनी-हिताच्या निरर्गल स्वार्थातून सर्व जग जाळत सुटायचंत्याचाच अनिवार्य परिणाम म्हणून, एका बाजुला जग आर्थिक-विषमतेत होरपळत असताना, दुसऱ्या बाजुला जागतिक तापमानवाढीत पोळून निघतंय! हीच ती विकृती आहे जी जगभरातल्या बदमाष राजकारण्यांना आपल्याकडच्या अफाट पैशाने पोसत असते आणि बदल्यात, त्यांच्याकडून आपापल्या कॉर्पोरेटीय-हितसंबंधांचं नीतिशून्य संरक्षण-संवर्धन करत असते.

तसं पहाता, नाक्या नाक्यावरचा गटारात लोळणारा (हल्ली गटारं बंदिस्त असल्याकारणाने त्यांची थोडी पंचाईत झालीय, इतकंच) 'अल्कोहोलिक' 'भावड्या' आणि CEO नावाचा वर्कोहॉलिक 'मावड्या' यांच्यात तत्त्वतः फारसा फरक नाहीच उलट, भावड्यांच्या व्यसनामुळे त्यांची कुटुंबच फक्त बरबाद होताना दिसतात; पण, या मावड्यांच्या मर्कटचाळ्यांमुळे प्रसंगी अवघी मानवजातच संकटात सापडते तत्पूर्वी, यांच्या कृपेने त्यांच्या कंपनीतला कामगार-कर्मचारीवर्ग जेरीला आलेला असतो आणि समाजात आर्थिक-विषमतेचा नंगानाच सुरु झालेला असतो. वस्तुतः, हे CEOs स्वतः त्या 'भांडवली-व्यवस्थे'चे खरंतरं 'गुलाम'च असतातपण, ते मरेपर्यंत त्यांच्या ध्यानी येत नाहीत्यांचा I.Q. (Intelligent Quotient) कितीही उच्चदर्जाचा असला; तरीही, E.Q. (Emotional Quotient) आणि S.Q. (Spiritual Quotient) यांचा त्यांच्या ठायी पत्ताच नसतो!

ज्या जर्मनीचा दाखला देऊन राष्ट्रकार्यासाठी आठवड्याचे ७० तास काम करा; असं (वा)नरायण मूर्ती सांगत होते त्या जर्मनीचं दुसऱ्या महायुद्धाच्या अंति काय घडलं? जे घडलं, ते या अशाच 'कर लो दुनिया मुठ्ठी में' या राक्षसी-सैतानी वृत्तीनेच! किंवा, ज्या चीनचं उदाहरण देऊन हे L&T चे सुब्रमण्यम, चीनसारखी झपाटल्यागत प्रगती करण्यासाठी राष्ट्रकार्य म्हणून आठवड्याचे ९० तास काम करा, असं सांगताहेत किंवा, I regret that I cannot make you work on Sundays How long can you stare at your wife and how long can she stare at you? Get to work instead!, असं बरळण्याची हिंमत करताहेत; त्यांच्या कुणीतरी कानाखाली जाळ काढून सांगितलं पाहिजे की, चीन हे काहीही झालं तरी, साम्यवादी (कम्युनिस्ट) राष्ट्र आहे आणि जेव्हा, त्यांनी काळाच्या ओघात आपल्याच ऐतिहासिक घोडचुकांमुळे ओढवलेलं आपलं मागासलेपण झटकून टाकून पुढे झेपावायचं ठरवलं; तेव्हा, त्यांच्या डोळ्यापुढे एक निश्चित योजना होती, अंततः, भांडवली-विचारसरणीच्या शत्रूराष्ट्र असलेल्या अमेरिकन अर्थव्यवस्थेला पंगू बनवण्याची (ज्यात, ते बऱ्याच अंशी यशस्वीदेखील झालेत). त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी काहीकाळ नाईलाजास्तव, अगदी ठरवून कामगार-कर्मचाऱ्यांकडून ('कामगार-कायदे' गुंडाळून) ठेऊन कमी वेतनात मरमर काम करवून घेतलं, हे नाकारता येणे नाहीच; पण, त्यानंतर विशिष्ट उद्दिष्टपूर्तिपश्चात, अगोदर ठरल्या योजनेबरहुकूम त्यांनी पुन्हा काहीकाळाने पूर्ववत आपल्या जगभरातल्या सर्वोत्तम गणल्या जाणाऱ्या 'कामगार-कायद्यां'ची अंमलबजावणी सुरु केली व 'समृद्धी सर्वांची' (Common-Prosperity) या साम्यवादी-तत्त्वाची अंमलबजावणी तेवढ्याच कठोरपणे लागू केली. परिणामतः, आज चीनमधलं कामगार-कर्मचारीवर्गाचं वेतनमान भारतासारख्या देशांना मागे टाकून सुसाटत पुढे निघालंय चीन आता, स्वस्त मजुरांचा देश-प्रदेश मुळीच राहीलेला नाही. त्याउलट, १९९०-९१च्या 'खाउजा-धोरणा'पश्चात (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण) २०-२५ वर्षात भारतात एवढी संपत्ती निर्माण झाली की, तेवढी मागील २००-२५० वर्षात कधिही झाली नव्हतीपण, खाउजा-धोरण राबवताना आधी संपत्ती निर्माण होऊ द्या, मग तिच्या न्याय्य वाटपाचं बघता येईल, असं म्हणणाऱ्या (वा)नरायण मूर्ती व एस. एन. सुब्रमण्यमसारख्या झारीतल्या शुक्राचार्यांच्या डोळ्यांनी, ती संपत्ती वरचेवर अडवली 'झिरप-सिद्धांता'नुसार (Trickle-Down Theory) ती खाली झिरपूच दिली नाही! यांनीच त्या काळात बेलाशक साम, दाम, दंड, भेद नीति वापरुन VRS/VSS (प्रत्यक्षात, CRS) देशात राबवली व कंत्राटी-कामगार पद्धती, OutSourcing वगैरेंची गुलामगिरी देशभर निर्माण केली व नव-अस्पृश्यतेचा कर्करोग (कॅन्सर) राष्ट्रपुरुषाच्या देहात खोलवर रुजवला!

थोडक्यात, चिनी राज्यकर्त्यांवर व चिनी व्यवस्थेवर, तेथील जनतेनं राष्ट्रकार्य म्हणून विश्वास ठेवणं ठीक पण, भारतासारख्या (वा)नरायण मूर्ती आणि सुब्रमण्यमसारख्या 'भांडवली-मुखवटे' चढवलेल्या विकृत प्रवृत्तींची भरती असलेल्या, 'व्यवस्थे'वर यःकिंचितही विश्वास ठेवणं म्हणजे, आपल्याच हातानं कुऱ्हाडीचा घाव, आपल्या पायावर घालून घेणं! शिवाय, माओत्सेतुंगसारख्या आततायी राष्ट्रप्रमुखामुळे १९७८-७९ पर्यंत चीनमध्ये जी भीषण परिस्थिती निर्माण झाली होती; तशी आपल्याकडे परिस्थिती कधिच नव्हतीकारण, आपल्याला पं. जवाहरलाल नेहरुंसारखे दूरदृष्टीचे, तरल बुद्धीचे व संवेदनशील नेतृत्त्व प्रथमपासूनच लाभले होते.

तंत्रज्ञानाची सतत बेछूट प्रगती होत राहिल्याने जगभरात उद्योग-सेवाक्षेत्रातील रोजगार-क्षमता मारली जाऊन "Jobless-Growth'च केवळ, नव्हे; तर, "Jobloss-Growth'सारखा समाजघातकी पायंडा पडत असल्याकारणाने कामाचे दिवस व दिवसाचे कामाचे तास कमी करण्याकडे सार्वत्रिक कल आहे! अशा पार्श्वभुमीवर, हे दोघेही भाजपा-संघाच्या आदेशाने, तशा श्रमिक-कल्याणकारी विचारप्रवाहाचा भारतात शिरकाव होऊच नये म्हणून राष्ट्रकार्याच्या गोंडस-फसव्या आवरणाखाली, दिवसाचे चोवीस तास राबा, अशा 'उलट्या बोंबा' मारत असावेत!

ज्या लार्सन आणि टुब्रो या दोघा डॅशिंग डॅनिश-तंत्रज्ञांनी (Danish engineers) वर्ष-१९३८ मध्ये 'Larsen Toubro' कंपनीची स्थापना केली, त्या त्यांच्या डेन्मार्क देशात आठवड्याचे सरासरी फक्त ३२ तास काम केलं जातं (कुणालाही अधिकचं काम अथवा ओव्हरटाईम करु दिला जातं नाही); त्यामुळेच, जगभरात ज्याला 'Work-Life Balance' म्हणतात, त्यात डेन्मार्कचा ३ रा नंबर लागतो, हे या दुढ्ढाचार्यांना काय माहित नसेल, असं समजता?

कामगार-कर्मचारीवर्गाविरोधात कायम विषारी 'फुत्कार' आणि बड्या भांडवलदारवर्गावर प्रेमाची 'फुंकर'च घालत बसणार काय, हे लोक? याचं कारण, या तथाकथित बड्या लोकांच्या लेखी 'राष्ट्र' म्हणजे, फक्त हा सगळा भाडखाऊ भांडवलदारवर्गच होय त्यांच्या व्याख्येत, तुम्ही आम्ही जनसामान्य अजिबात बसत नाही!

हे स्वतः यंत्रमानव (Robot) बनलेत आणि दुसऱ्यांकडून त्यांची तिचं अपेक्षा आहे यांना खरंतरं खालून मिरचीची धुरी देऊन स्पष्ट शब्दात सांगितलं गेलं पाहिजे की, आम्ही कॉर्पोरेट्ससाठी जन्माला आलेलो नाही; कॉर्पोरेट्स आमच्यासाठी जन्माला आलीयत!

तेव्हा, खूप झाली यांची कॉर्पोरेटीय भांडवली-नाटकं. आता, 'भांडवली-व्यवस्थे'ला लोकशाही-प्रक्रियेतून उलथवून 'साम्यवाद-समाजवाद' (Communism-Socialism) आणाच म्हणजे, हे सगळेच 'भांडवली-दुढ्ढाचार्य' सुतासारखे सरळ येतील!

आपल्या राष्ट्रपित्याने प्रतिपादन केल्याप्रमाणे निसर्ग-पर्यावरणपूरक साध्यासुध्या नैसर्गिक आनंदी जगण्याला कवटाळायला आपण शिकलो; तरच, आपसूक हे सगळे मस्तीखोर लोक, ताळ्यावर येतील व जागतिक-तापमानवाढीमुळे उद्भवलेलं मानवजातीपुढचं पर्यावरणीय महासंकट टळेल धन्यवाद!

***राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# साईखडियाने काई प्रार्थावे। सूत्रधाराते ?

या वर्षातील पहिला महिना संपलाय. या महिनाभरात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. कर्जाचा बोजा इतका वाढला आहे की, देशाची अर्थव्यवस्था कोसळण्याच्या बेतात आहे असा गंभीर इशारा जागतिक बँकेने सरकारला दिला. दुसरी घटना अमेरिकेतील सर्वात ग्लॅमरस उच्चभ्रू 'लॉस एंजेलीस' नगरी वणव्यांमधे जळत, होरपळत असल्याची आहे. उपराष्ट्राध्यक्षा कमला हॅरिस, अभिनेता टॉम हँकसारख्या अनेक उत्सवमूर्तींसह हजारोंच्या आलिशान घरे व मोटारींची राख झाली आहे.

बिकट आर्थिक परिस्थितीची कल्पना देण्यासाठी मोटार उद्योगाला भेडसावत असलेल्या संकटाकडे बोट दाखवले जाते. ग्राहकांना बहकवण्याचे सर्व मार्ग वापरूनदेखील मोटारींच्या मागणीत सतत घट होत आहे. यातील मेख अशी आहे की, अर्थव्यवस्थेकडून प्रगती व विकासाचे प्रतिक व मानदंड बनवली गेलेली मोटार हीच वणव्यांचे मुख्य कारण आहे.

भारताला कर्जात बुडण्याबाबत जागतिक बँक मानभावीपणे इशारा देते, पण हा तर या बँकेनेच लावलेला सापळा आहे. 'जागतिक बँक', 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी' या मानवजातीच्या संस्था आहेत आणि मानवाच्या हिताचे काम करतात असा भास होतो; परंतु, ह्या अर्थव्यवस्थेच्या जागतिक सूत्रधारांच्या खाजगी हितसंबंधांच्या संस्था आहेत.

औद्योगिकरण, शहरीकरण व अर्थव्यवस्थेमुळे पृथ्वीची तापमानवाढ होत आहे आणि 'हवामान बदल' हा त्याचा दृश्य परिणाम आहे. तापमानवाढ घडवणाऱ्या कार्बन उत्सर्जनास सर्वाधिक कारणीभूत असलेल्या, तेल-कोळसा, वीज आणि सीमेंट या घटकांना मोटार प्रामुख्याने जबाबदार आहे. जगात कुठेही धावणारी मोटार, बनणारी वीज व सीमेंट काँक्रिट हे वणवे लावत आहेत.

मोटारींना प्रोत्साहन द्यायचे आणि वणवे पण टाळायचे हे शक्य नाही. यकृत निरोगी हवे पण दारू सोडणार नाही, असे म्हणण्यासारखे आहे हे. भारतातील अमेरिकेचे राजदूत, वाढत्या धार्मिक कट्टरतेबद्दल चिंता व्यक्त करून म्हणाले की, बेकारीमुळे हिंसाचार वाढतो, गरीबांना संधी देण्यास रोजगार वाढवणे आवश्यक आहे, म्हणजे औद्योगिक विकास वाढवा. कुठुनही शेवटी औद्योगिकरण वाढवा हाच सल्ला. जणू औद्योगिकरणाआधी सर्वत्र हिंसाचार होता. ही अर्थव्यवस्था हा असा वणवा आहे, जो पृथ्वीच्या सर्व जैविक संसाधनांना, जीवनाला जाळून खाक केल्याशिवाय शमणार नाही. ५०-६० वर्षांपूर्वीच्या कॅलिफोर्नियातील सर्वांत सुंदर थंड 'लॉस एंजेलीस'चे आज दिसणारे वणवे हे या अर्थव्यवस्थारूपी न दिसणाऱ्या वणव्यामुळे लागत आहेत. याला अर्थातच, अमेरिका स्वतः जबाबदार आहे. आपले राजकारणी वाढवण जैतापूर, बारसू प्रकल्प करून कोकणचा असा कॅलिफोर्निया करणार आहेत.

उद्योग जगवतो, नोकरी जगवते हा भ्रम, हे मिथक, तात्काळ खोडून टाकण्याची गरज आहे. औद्योगिकरणाला विकासाचा मुख्य प्रवाह म्हणणे, ही ग्लानी आहे. जीवनाच्या विकासाचा प्रवाह, हा पृथ्वीवरील मुख्य व एकमेव प्रवाह आहे. औद्योगिकरण व अर्थव्यवस्था जीवनाचा अंत करत आहे. ज्या प्रदेशांत जीवनाचा सर्वाधिक विकास झाला, त्या प्रदेशांना अविकसित ठरवले जाणे आणि जेथे जीवन सतत नष्ट केले जाते, त्या औद्योगिक शहरांना, देशांना विकसित म्हटले जाणे हा आधुनिकांचा निर्बुद्धपणा आहे .

या २०२५ वर्षात, औद्योगिक युगाचा जन्म झाला, त्या सन १७५६ च्या तुलनेत पृथ्वीच्या सरासरी तापमानात ३ अंशाची, जीवनाच्या उच्चाटनावर शिक्कामोर्तब करणारी, निर्णायक वाढ होत आहे. सध्या पृथ्वीचा दक्षिण गोलार्ध सूर्याच्या उष्णतेला सामोरा गेला असताना, उत्तर गोलार्धात अमेरिकेत भीषण वणवे लागत आहेत. ही घटना त्या अंतिम विनाशाची घंटा वाजवत आहे. पृथ्वीच्या सरासरी तापमानात ५ वर्षांत १ अंश या अभूतपूर्व गतीने होत असलेल्या या वाढीने मानवजात व जीवसृष्टीचे फक्त २५ वर्षांत उच्चाटन होईल यात कोणतीही अतिशयोक्ती नाही. आता प्रत्येक दिवस महत्त्वाचा आहे.

हा विनाश अमेरिका चीनसारख्या तथाकथित महासत्ता वा अन्य कुणाच्या तंत्रबळाने वा अर्थबळाने रोखला जाऊ शकत नाही, हे गेल्या दशकातील घटनांनी दाखवले आहे. तरी आपण राजकारण आणि भौतिक विकासाच्या, सुख समृध्दीच्या नशेत चूर आहोत. आर्थिक नशेत, २०३० सालात भारतात रोज बारा हजार गाड्या रस्त्यावर आणण्याची भ्रमिष्ट बडबड करत आहोत. हा विनाश फक्त आत्मबळाने रोखता येईल. हे आत्मबळ अनासक्ती संयम व साधेपणाने हजारो वर्षे संस्कृती टिकवणाऱ्या भारताकडे होते. ते स्वातंत्र्यलढ्यात प्रकट झाले होते. पण गेल्या साठ वर्षांत पाश्चात्यांच्या भौतिक विकासाच्या अंधानुकरणात भारताने ते गमावले आहे.

अर्थव्यवस्थेने उद्योग, विकासाच्या व रोजगार देण्याच्या नावाने निसर्गाविरुध्द युध्द चालवले आहे. यात ज्या मानवजातीच्या प्रगतीच्या बतावणीने हे होते, ती मानवजात व जीवसृष्टी होरपळत आहे.

मुख्यमंत्री फडणवीसांनी या युध्दाच्या युध्दकक्षात (वॉररूम) बसून आदेश दिले की, 'पालघर जिल्ह्यातील प्रस्तावित वाढवण बंदरासाठी आवश्यक असलेले जमीन हस्तांतरण आणि परवानग्या ३१ मार्चपर्यंत द्या'. पुढे ते म्हणतात, 'राज्यातील १९ प्रकल्पांच्या अंमलबजावणीत होणाऱ्या विलंबास संबंधित विभागांना जबाबदार धरले जाईल आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल'.

माणसाने आपली मर्यादा ओलांडली आहे. तो पृथ्वीच्या घडणीला चिरडून टाकत आहे; पण, त्याला हे भान नाही की, हे स्वतःला चिरडणे आहे. सत्ताधीशांना पृथ्वी छिन्नविच्छिन्न करण्याचा अधिकार कोणी दिला? न दिसणाऱ्या जिवाणू,



# भाजप-संघ सत्ताधाऱ्यांकडून प्रजासत्ताकाचा अमृतमहोत्सव, का साजरा केला जात नाहीये...???

**ज्या तथाकथित 'हिंदुत्ववाद्यां'ना स्वातंत्र्य १९४७ साली मिळालं, हे आजही मान्य नाही व ज्यांच्या पूर्वसुरींचा, देशाच्या स्वातंत्र्य-चळवळीत कुठे सहभाग नव्हता; त्यांनी ३ वर्षांपूर्वी म्हणजे वर्ष-२०२२साली स्वातंत्र्याचा 'अमृतमहोत्सव', नाईलाजास्तव का होईना; पण, हर घर तिरंगा घोषणा देत साजरा केला होता...तेच आज प्रजासत्ताकाचा अमृतमहोत्सव साजरा करण्याबाबत एवढे कमालीचे उदासीन का...???**

...सत्ताधारी भाजप-संघ, प्रजासत्ताकाचा 'अमृतमहोत्सव' (वर्ष १९५० ते वर्ष-२०२५) साजरा करण्याबाबत उदासीन असण्यामागचं कारण, ते मूलतः, मुठभरांच्या हातात सत्ता केंद्रित ठेवण्याच्या 'वर्णवर्चस्ववादी-शोषक' मानसिकतेचे आहेत. 'प्रजासत्ताक' म्हणजे, प्रजा देशाची 'मालक' असण्याच्या 'लोकशाही-तत्त्वा'ला त्यांचा मुळातूनच विरोध आहे.

ते स्वतःला 'हिंदुत्ववादी देशभक्त' म्हणवतात; पण, त्यांनी स्वातंत्र्य-चळवळीला शक्य तेवढा अपशकूनच केलेला आहे...तेव्हा, ते 'बुलेट'ला घाबरले आणि आज ते 'बॅलेट'ला घाबरतायत! ब्रिटीशकालीन इतिहासाच्या नोंदी ढळढळीत साक्षी आहेत की, याच विचारसरणीच्या 'बनावट-हिंदुत्ववाद्यां'नी...याच विचारसरणीच्या 'बनावट-देशभक्तां'नी म. गांधी-पं. नेहरुंच्या 'अहिंसक' स्वातंत्र्य लढ्यासह...नेताजी सुभाषचंद्र बोसांच्या सशस्त्र स्वातंत्र्य लढ्याच्याही पाठीत खोलवर खंजीर खुपसलेला होता!

...म्हणूनच, कंगना राणावतसारख्या महामूर्ख नटीसह तथाकथित हिंदुत्वाचे स्वयंघोषित ठेकेदार RSS-प्रमुख मोहन भागवत जर, जाहीरपणे भारताला स्वातंत्र्य १९४७ साली नव्हे; तर, २०१४ साली भाजप मोदींच्या नेतृत्त्वाखाली सत्तेवर आल्यावर अथवा 'राममंदिर' उभारणीनंतर मिळालं; असं म्हणत असतील...तर, तो भगतसिंग, खुदीराम बोस, अश्फाक उल्ला खान, उधमसिंग, सुखदेव, राजगुरु, मंगल पांडे, बाबू गेनू, शिरीषकुमार यासारख्या ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांनी सांडलेल्या रक्ताचा आणि म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरुंसारख्या असंख्य नरवीरांनी भोगलेल्या तुरुंगवासासारख्या अनंत यातनांचा घोर अपमान आहे... म्हणूनच, असं अघोरी वक्तव्य करणाऱ्या मोहन भागवतांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा, ही राहुल गांधींची मागणी अगदी रास्त आहे.

ते स्वतःला 'हिंदुत्ववादी' म्हणवतायत...पण, ते हिंदुत्वाचा आत्माच नष्ट करुन पहातायत! कुठल्याही धर्मबंधनातून मुक्ति करवून घेऊन फक्त, माणूस म्हणून जगण्याचं स्वातंत्र्य...जेवढा हिंदूधर्म देतो, तेवढं वैयक्तिक निवडीचं-स्वातंत्र्य, जगातला इतर कुठला धर्म कदाचित देत नसेल! खरंतरं, हिंदु हा लौकिकार्थाने धर्म कमी आणि जीवनपद्धती अधिक आहे...म्हणूनच, Hinduism is an Eclectic in the sense that it offers complete freedom and believes in individual choices, असं म्हटलं जातं.

...काळाच्या ओघात अनेक मोठ्या त्रुटी, मोठे दोष त्यात जरुर निर्माण झालेले असले; तरी जसे, चीनच्या ऐतिहासिक भिंतीचे तडे, ती भिंत तोडण्याऐवजी लिंपले जावेत, बुजवले जावेत...तसं काही होण्याऐवजी, या भाजप-संघीय उपद्व्यापी हिंदुत्ववाद्यांमुळे देशातच नव्हे; तर, जगभरात अनेकांच्या मनात हिंदूधर्माविषयी प्रेमादराऐवजी एकाबाजुला धडकी भरते आहे आणि दुसऱ्या बाजुला टोकाचा तिरस्कार निर्माण होतो आहे.

म्हणूनच, ते हिंदूधर्माचे मारेकरी आहेत...'प्रजासत्ताका'चे तर ते मारेकरी आहेतच!

**...तेव्हा, यांना ठणकावून सांगितलं पाहिजे, राममंदिरं कसली उभारताय...अंतःकरणात रामाला जागवा, हृदयात रामाला उतरवा. एकीकडे हिंदू सहिष्णू-वृत्तीला शिव्याशाप देत रहायच्या आणि दुसरीकडे वरकरणी 'अतिसहिष्णू' रामाची मंदिरं बांधायची व 'रामनामा'ची जपमाळ ओढायची...परंपरेने सदैव सीता-लक्ष्मण-हनुमानासह दिसणाऱ्या अतिशय प्रेमळ, सत्यवचनी, न्यायी, कुटुंबवत्सल रामाला धनुष्यबाणासह उग्र, संतापी व आक्रमक एकाकी पेश करायचा... यांच्या उरात असत्यवचनी-अन्यायी-हिंसक रावण; पण, मंदिरात राम आहे, हा असला उफराटा प्रकार, अजून कितीकाळ सहन करायचा?**

**...हाच, आजच्या प्रजासत्ताकाच्या अमृतमहोत्सवदिनी, करोडो-करोडो मोलाचा प्रश्न आहे!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## साईखडियाने काई प्रार्थावे। सूत्रधाराते?

सूक्ष्मजीव, गांडुळांपासुन ते हत्ती पाणघोडे, व्हेलसारखे महाकाय सर्व सजीव सारखेच जीवनाचे अविष्कार आहेत. यात माणुसही आला. त्यातील मिलियनेअर, बिलियनेअर ट्रिलियनेअरसहित सर्व सत्ताधीशही आले. त्यांना आपले निर्णय पृथ्वीवर लादण्याचा काही अधिकार नाही. त्यांच्या स्वतःच्या हृदयांवर, त्यांच्या शरीरातील त्यांच्या नकळत सतत जिवंत व कार्यरत असलेल्या लाखो कोटी पेशींवरही त्यांची सत्ता नाही. त्या अदभूत प्रक्रियेत त्यांचे काही कर्तृत्व नाही.

जगातील सर्व सरकारे सर्व आर्थिक वा लष्करी सत्ता हास्यास्पद आहेत. जेव्हा ते गावांवर, डोंगर, जंगलावर बुलडोझर व पोर्कलेन फिरवण्याचे बेगुमान आदेश देतात, तेव्हा ते आपल्याला अस्तित्व देणाऱ्या सृजन घडवणाऱ्या तत्त्वाचा, ईश्वराचा अधिक्षेप करतात, त्यालाच आव्हान देतात.

ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानेश्वरीत गीतेच्या ९ व्या अध्यायावर निरूपण करताना ३०व्या ओवीत म्हणतात, साईखडियाने काई प्रार्थावे। सूत्रधाराते?. कठपुतळीने सूत्रधाराला आज्ञा करावी का? अर्थातच नाही. आज सत्ताधीश सूत्रधाराला म्हणजे निर्मितीतत्वाला आज्ञा देण्याचे, त्यांच्या कोट्यवधी वर्षांत घडलेल्या सृजनाला उध्वस्त करण्याचे औध्दत्य करत आहेत.

आज ईश्वराच्या या 'पृथ्वी' नावाच्या अनुपम रचनेला, अज्ञानातून आलेल्या मदामुळे उध्वस्त केले जात आहे. 'अस्तित्व की अर्थव्यवस्था', हे ठरवण्याची, हे वर्ष ही अंतिम संधी आहे.

'आम्ही माणसांचे मेंदू हॅक करू शकतो', अशी प्रौढी मिरवणाऱ्या जागतिक आर्थिक परिषदेसारख्या विधिनिषेधशून्य संस्था, हा अर्थव्यवस्थारूपी वणवा अधिक भडकवत आहेत. हे सल्ले देतात आणि देशोदेशीचे सत्ताधीश ते ऐकतात. मग आपल्या करणीने मानवजात नष्ट होईल हे माहीत असल्याने, हेच धूर्त, कोविडसारख्या, नसलेल्या विषाणूंच्या नावाने लसीकरण करून मानवसंहार करतात.

या महाविनाशातून, भारतीय तत्त्वज्ञान, धर्म व अध्यात्माचे सार घेऊन आलेले ज्ञानदेवांचे पसायदानच जगाला वाचवू शकते. केवळ एक प्रकल्प एका ठिकाणी लढा देऊन रद्द करून, आपण वाचणार नाही. तो प्रकल्प दुसऱ्या ठिकाणी होईल. ते ठिकाण पृथ्वीवरच असेल. जर बंदर नको, तर बंदरातून उलाढाल होणाऱ्या वस्तुदेखील नको. जर रिफायनरी नको तर मोटारही नको. जर औष्णिक विद्युत केंद्र नको, तर वीजदेखील नको, या भूमिकेत, हे कितीही नावडते वाटले तरी यावेच लागेल. आम्हाला प्रकल्प नको, पण आमचा विकासाला विरोध नाही, हे अर्थशून्य विधान थांबवावे लागेल.

भौतिक विकास हा पृथ्वीच्या पध्दतीच्या विरोधात जात असल्याने, जीवनाच्या रक्षणासाठी, त्याला विरोध हवा. आंदोलन निर्वैर असावे, जसे शंभर वर्षांपूर्वी मँचेस्टरच्या स्वयंचलित यंत्रांच्या विरोधात, चरखा हातमाग चालवणाऱ्या आपल्या भारतीय आजोबा, पणजोबांनी केले. हा आदर्शवाद वा स्वप्नाळूपणा नाही, हे प्रखर वास्तव आहे. आपण जे भौतिक वस्तुंचे जग जगत आहोत ते आपल्याला कितीही व्यवहार्य वाटले तरी, ते तसे नाही, ते फक्त कथा-कल्पनेतच असायला हवे होते, ही गोष्ट पृथ्वी आणि जीवसृष्टीच्या उत्क्रांतीच्या शेकडो कोटी वर्षांच्या निर्मितीप्रक्रियेचा भाग बनलो तर, समजेल. केवळ वाढवणच नाही; तर, महाराष्ट्र सरकारचे सर्व १९ प्रकल्प रद्द व्हावे. आजही उद्योगपूर्व काळातील जीवनपद्धती टिकवून असलेल्या गावांना मागास ठरवून नष्ट करण्यात शहाणपण नाही; उलट, भारताला आपल्या स्वयंपूर्णतेमुळे स्वातंत्र्य मिळवुन देणारी ही गावे, मानवजात व जीवसृष्टीच्या रक्षणासाठी आशेचे किरण आहेत.

***...डॉ. गिरीश राऊत***

(निमंत्रक : भारतीय जीवन व पृथ्वीरक्षण चळवळ)

# देवेंद्रजी, नक्षलवाद्यांविरोधात धडाडणाऱ्या तुमच्या बंदुका, भ्रष्टाचाराचा गंज चढल्याने इथे लाचार का होतात???



हा प्रश्न, फक्त बीडच्या धनंजय मुंडेंपुरता किंवा त्यांचा 'हस्तक' असलेल्या 'वाल्मिकी' कराड-गँगपुरता मर्यादित नाहीच या गुन्हेगारी-खंडणीखोर राजकारणाचा विळखा पुरत्या महाराष्ट्राला केव्हाचाच पडलाय (इथे 'आकाचा आका' म्हटल्या गेलेल्या धनंजय मुंडेंचा कालपर्यंत 'आका' कोण होता आणि आज कोण आहे, हा प्रश्नही अप्रस्तुत ठरु नये)!

सध्या, एकीकडे भाजप-संघीय मंडळी अयोध्येत 'राममंदिर' बांधताना दिसतायत; तर, दुसरीकडे वस्तुस्थिती ही दिसते की, सतयुगातल्या रामायणातील 'वाल्याचा वाल्मिकी' होण्याचे दिवस संपलेत आता, वाल्मिकीचा (उदा. सध्याचा बीडचा वाल्मिकी) 'वाल्या' होण्याचे दिवस, कलियुगीन भाजपाई-रामायणात आलेत.

एका अचानक गायब करण्यात आलेल्या प्रामाणिक, बेडर आयपीएस अधिकाऱ्याचा बीडमध्ये अजूनही ठावठिकाणा लागू शकू नये? IPS / IAS अधिकारीवर्ग, हा खरंतरं या देशातील प्रशासनाचा पोलादी-सांगाडाच जसा आपल्या शरीरातील हाडांचा सापळा, शरीराचा सगळा भार तोलून असतो आणि त्या सांगाड्याशिवाय, शरीर म्हणजे फक्त रक्तामांसाचा नुसता गोळा बनून जाईल तशीच या IPS / IAS अधिकाऱ्यांची प्रशासकीय-चौकट, ही देशाच्या कारभाराचा सगळा भार सांभाळत असते. पण, आज भ्रष्टाचाराचा पाणी त्यात पुरतं मुरल्याने, त्या पोलादी-चौकटीतलं पोलादचं एवढं गंजून गेलंय-सडून गेलंय की, त्या सेवेतील एखादा अडचणीचा ठरणारा प्रामाणिक व कर्तृत्ववान अधिकारी, राजकारणी गावगुंडांकडून गायब करण्यात येतो; तरीही, बाकीच्यांना काहीच खंत किंवा शरम वाटू नये? हे सगळंच, सडलेल्या-किडलेल्या व्यवस्थेचं भयावह लक्षण आहे!

ज्यांना ज्यांना या महाराष्ट्राने आपले मोठे वंदनीय नेते म्हणून आपल्या छाताडावर मिरवले त्यांनी या महाराष्ट्राला कुठल्या लायकीचे आमदार-खासदार-मंत्री व अन्य लोकप्रतिनिधी दिले याची आपण एकदा 'सामाजिक-तपासणी' (Social Audit) करणार आहोत की, नाही? या तथाकथित वंदनीय नेत्यांनी 'इलेक्टिव्ह-मेरिट', ही निवडणुकीत उमेदवारी देण्यासाठी लावलेली एकमेव खतरनाक कसोटीच, या नेत्यांना आपसूकच राजकारणाच्या पडद्याआडचे 'खलनायक' बनवत असते, हे विसरुन कसं चालेल? बायबलमध्ये लिहीलंय, ''झाडाच्या जातीची-प्रतीची तपासणी करायला मुळं उचकटून पहायची गरजच काय नुसत्या फळांवरुनच त्यांची खरी परीक्षा होते (Matthew 7:16 "By their fruits you will recognize them Do people pick grapes from thorn bushes, or figs from thistles?)'' याचा केवढा गहनगंभीर अर्थ आहे, तो आम्ही कधि लक्षात घेणार?? तो गहन अर्थच, आम्ही विविध जयंत्या-मयंत्या साजऱ्या करण्याच्या आणि सार्वजनिक पूजा-गणेशोत्सव, दहीहंड्या, गरबे, भंडारे; तसेच, विविध खेळ-महोत्सव यांच्या 'फाजिल-उत्सवप्रियते'च्या नादाने विसरुन गेलोत!

जे बीडमध्ये तेच ठाण्यात आणि तेच नवी मुंबईत तेच पुणे, मालवण, पनवेल, नाशिक, नागपूर, संभाजीनगरातदेखील! सगळीकडेच राजकारणात हातपाय पसरलेले आणि त्यातल्या गुन्हेगारीवर फोफावलेले 'धनंजय मुंडे' किंवा धनंजय मुंडेंचे 'आका' आहेत फरक काही असेल तर, तो फक्त नावारुपातच आहे; खंडणीखोर, खुनशी गुन्हेगारी-प्रवृत्ती तशीच झपाट्याने विकसित होत जाणाऱ्या सगळ्याच 'महानगरी' नावाच्या 'काँक्रिटच्या जंगलां'ची, ती आणि तशीच कर्मकहाणी आहे.

हे सगळं दुष्टचक्र, ही बीडसारखी नियमितपणे जागोजागी खेळली जाणारी रक्तरंजित क्रौर्यपूर्ण होळी क्षणभरात थांबवण्याची; नव्हे, ती साफ मोडून काढण्याची क्षमता IPS / IAS अधिकाऱ्यांच्या पोलादी-चौकटीत खचितच आहे; पण, मग मोठमोठी हॉटेल्स चालवण्यासारखे धंदे किंवा काँक्रिट-बांधकामातल्या भागिदाऱ्या वगैरे बक्कळ पैसा मिळवून देणारे धंदे, राजकारण्यांच्या आशिर्वादा शिवाय कसे जमतील? आपली प्रशासकीय कारकीर्द जनसामान्यांवर गाजवताना कमावलेल्या भ्रष्टाचाराच्या काळ्या पैशाला कायमस्वरुपी संरक्षण कुठून मिळेल?? भरपूर काळ्या कमाईचं, हवं ते 'पोस्टिंग' कसं मिळेल??? ''अब भी कुछ लोगों ने बेची हैं न अपनी आत्मा ये पतन का सिलसिला कब तक चलता रहेगा? हैं बहुत अँधियार अब सूरज निकलना चाहिए जिस तरह से भी हो ये मौसम बदलना चाहिए''

***...राजन राजे***
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

**जसजसा मध्यमवर्गीय घराघरांतील पोरसवदा वयाची मुलं-मुली व नवतरुण पिढीवरचा दबाव वाढून असह्य बनत जातो...तसतशा, मध्यमवर्गीय घरातल्या मुलांच्या घरातून पळून जाण्याच्या किंवा आत्महत्या करण्याच्या अनुचित घटनांमध्ये कमालीची वाढ होते आणि 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार', हेच जणू मध्यमवर्गीय जगण्याचं अविभाज्य अंग बनत जातं. आपल्या दारुण आणि करुण परिस्थितीला ही भांडवली-व्यवस्था जबाबदार नसून; आपल्यातच काही कमतरता आहे, त्रुटी आहेत...अशी हळूहळू मनोमन प्रत्येकाची खात्री पटत जाते. जनसामान्यांच्या अधू नजरेला, ही निर्मम-शोषक व्यवस्था, आपली कशातऱ्हेनं भयंकर फसवणूक व शोषण करतेय, हे तसंही नीटसं दिसत नसतंच; पण, अशा काही 'भांडवली-व्यवस्थे'तील कृष्णछायेला धरुन असलेल्या 'धवल रंगछटा' पाहिल्या की, ते शब्दशः 'नजरबंद' होतात. ...राजन राजे (भाई)**





## *कुंभमेळ्यातील सौंदर्यवती मोनालिसा...*

*लोकसत्तेत अग्रलेखाच्या पानावर 'उलटा चष्मा' सदरात, कुंभमेळ्यात माळा विकणाऱ्या मोनालिसा नावाच्या सौंदर्यवतीवर झकास लेख छापून आला आहे. एका पत्रकाराने तिला सांगितलं... मेळा संपेपर्यंत तू इथून जाऊ नकोस. यावर तिने साधेपणाने विचारलं, तुम्ही माझ्या माळा विकत घ्याल का?*

*तात्पर्य : धंद्याच्या गोष्टी ट्रम्पतात्याच करु शकतात असं नाही... गावरान मोनालिसाचं नाणंसुद्धा खणखणीत वाजू शकतं!*

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**